म. ग्रं. सं. ठाणें

विषय निबंध

लेखक हिंदु युनियन क्लबच्या एक सभासद

सन १८९४

संग्रहालय क्रमांक ३०

पुस्तकाचें नांव स्वपराक्रम.

१०
स.क्र. 130

# स्वपराक्रम.

निबंध

स. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
क्र. नं. ८३०
मन. ९८८३

# [illegible]ाक्रम

हें पुस्तक

**स्माइल्स सेल्फ हेल्प**

या इंग्रजी ग्रंथाच्या आधारानें हिंदु यूनियन क्लबच्या एका सभासदानें तयार केलें.

मुंबईंत

"गणपत कृष्णाजी"च्या छापखान्यांत छापविलें.

१८९३

किंमत चार आणे.

# स्वपराक्रम.

हें पुस्तक

स्माइल्स सेल्फ हेल्प

Self-Help — Smiles.

या इंग्रजी ग्रंथाच्या आधारानें तयार करून

(हिंदुस्थान सरकारच्या सन १८६७ च्या २५ व्या आक्टा-
प्रमाणें रजिस्टर करून सर्व हक्क ठेविले आहेत.)

मुंबई एथें

"गणपत कृष्णाजी"च्या छापखान्यांत छापविलें.

१८९३

किंमत चार आणे.

# प्रस्तावना.

'स्माइल्स सेल्फ हेल्प' या नांवाचा इंग्रजी भाषेंत एक सिद्ध ग्रंथ आहे. त्यांत उद्योगाची थोरवी वर्णन केली असून, दुसऱ्यांवर फारसें अवलंबून न राहतां स्वतांच्या मेहनतीनेंच मनुष्याची बढती कशी होते हें फारच उत्कृष्ट-रीतीनें दाखविलें आहे. अशा प्रकारचे लोकहितवादाचे ग्रंथ देशभाषांत प्रसिद्ध व्हावे हें फार इष्ट आहे. 'गुजराथी व्हर्न्याक्युलर सोसाइटी' या नांवाच्या मंडळीकडून कांहीं वर्षांपूर्वी सदरी ग्रंथाचें उत्तम भाषांतर करणारांस पांचशें रुपयांचें बक्षिस देण्याविषयीं जाहिरात प्रसिद्ध झाली होती, त्याप्रमाणें गुजराथी ग्रंथ तयार झालाच असेल. मराठी भाषेंतही अशा प्रकारचा ग्रंथ असावा असें वाटल्यावरून हें काम आह्मीं हातीं घेतलें आहे, आणि त्यांतील कांहीं भाग हल्लीं छापवून प्रसिद्ध केला आहे. यांत शब्दशः भाषांतर नसून मूळ ग्रंथाच्या आधारानें होईल तेवढा स्वतंत्र ग्रंथ लिहिण्याचा यत्न केला आहे. मधून मधून जरूर वाटली तेथें अन्य ग्रंथांतून कांहीं विशेष माहिती दिली आहे. या पुस्तकाची पहिली आवृत्ति १८७८ त छापली होती, व हल्लीं पुस्तकें मिळत नसल्यामुळें ही दुसरी आवृत्ति छापली आहे.

[library stamp]

# स्वपराक्रम.

"एकंदरींत देशांत लोक जसे असतील त्याप्रमाणें देशाचा उत्कर्ष किंवा अपकर्ष होणार आहे." मिल्ल.

"कायदेकानू वगैरे सामाजिक कृत्यें करण्याकडे लोकांचें लक्ष विशेष असतें, परंतु तेंच स्वतांचें वर्तन सुधरण्याविषयीं ते अगदीं निष्काळजी असतात." डिस्राएली.

"**प्रयत्नीं परमेश्वर**" ह्मणजे प्रयत्न करणारांस ईश्वर निश्चयेंकरून सहाय होतो हें ह्मणणें सर्वथा खरें आहे. या लहानशा वाक्याचा खरेपणा पुष्कळ लोकांच्या अनुभवास आला आहे. ह्मणून उद्योग हा मनुष्यास अवश्य आहे. ज्या मनुष्यास कांहींना कांहीं उद्योग करण्याची सवय आहे अशा मनुष्याचा उदय होण्यास फार वेळ लागत नाहीं, आणि असे उद्योगी मनुष्य देशांत सर्वत्र पसरले ह्मणजे देशाचाही उत्कर्ष व भरभराट होण्यास आरंभ झाला असें समजावें. दुसऱ्यांनीं आपल्यास कितीही मदत केली आणि आपण जर उद्योग केला नाहीं, आळशांप्रमाणें स्वस्थ बसलों तर त्या मदतीपासून विशेष फायदा न होतां उलट नुकसान मात्र होण्याचा संभव आहे. परंतु आपण जर खरोखर उद्योग करीत आहों आणि दुसऱ्याची यत्किंचितही जरी आपल्यास मदत नाहीं तरी त्या उद्योगाचें फळ खचित मिळणार आहे. ज्या कामाकरितां आपण स्वतां खपलें पाहिजे तें काम जर नेहमीं दुसऱ्याच्या मदतीनें होऊं लागलें तर कांहीं काळानें स्वतां उद्योग करण्याची आपली सवय नाहींशी होऊन

या जगांत आपण अगदीं निरुपयोगी ठरणार आहों. ज्या मनुष्यांस दुसऱ्यांची मदत फार आणि जे दुसऱ्यांचे ताबेदार अशांच्या हातून कोणतेंही ह्मणण्या मोठें काम होत नाहीं आणि तें करण्याची त्यांस इच्छा पण नसते. एकंदरींत अशांची कुव्वतच कमी होते असें ह्म णणें भाग आहे. शाळेंतले धडे तयार करण्यास ज्या मुलांस घरीं नेहमीं पंतोजी लागतो अशा मुलांचें पंतोजीशिवाय एक पाऊल देखील पुढें जात नाहीं आणि तीं अगदीं कूचकामाचीं होतात. परंतु उद्योगी मुलांस पंतोजीची गरज मुळींच लागत नाहीं आणि तींच पुढें नांवालौकिकास येतात ही गोष्ट पुष्कळांच्या पाहण्यांत आहे.

सरकारानें आमच्या हिताकरितां किती जरी प्रयत्न केले—शाळा घातल्या, पुस्तकें छापलीं, ग्रंथालयें स्थापिलीं, यंत्रालयें बांधलीं, कायदेकाउन्सिलांची योजना केली, पार्लमेंट सभेचे हक्क आह्मांस दिले, सर्व कांहीं केलें—परंतु आह्मी जर स्वस्थ बसलों, त्यांचा योग्य उपयोग केला नाहीं, तर त्यांपासून ह्मणजे देशास किंवा आपणास आज तादृश फायदा होईल असें ह्मणवत नाहीं. फार फार झालें तर त्यांपासून एवढें मात्र होईल कीं आमचें कर्तव्य काय आहे हें आह्मांस थोडें थोडें समजूं लागेल, आणि कदाचित् वाटलेंच कीं आपली स्थिति वाईट आहे आणि ती आपण सुधरावी, तर सुधरतां येईल, कोणतीही अडचण राहणार नाहीं; परंतु याहून कांहीं विशेष होईल असें वाटत नाहीं. शाळा घातल्या ह्मणजे लोक शहाणे होतील ही गोष्ट खोटी; त्यांपासून शिकणारांस मात्र एक सोय झाली. परंतु ज्यांस शिकण्याचीच इच्छा नाहीं अशांकरतां एक नाहीं हजारों जरी शाळा घातल्या, तरी



त्यांपासून फारसा फायदा होणार नाहीं हें उघड आहे. असें जरी आहे तरी लोकांस नेहमीं असें वाटत असतें कीं आमच्या हिताकरतां सरकारानें झटावें आणि आपण जरी स्वस्थ बसलों, कांहींच प्रयत्न केला नाहीं तरी हरकत नाहीं. ह्मणजे असें कीं रयतेच्या हिताकरतां सरकारानें उत्तम प्रकारचे कायदे करावे आणि रयतेनें स्वस्थ झोंपा घ्याव्या. पुष्कळ लोकांचा असा समज आहे कीं आह्मांस मोठमोठे हक्क मिळाले, कायदेकाउन्सिलांत आपला प्रवेश झाला, पार्लमेंट सभेंत आपल्यास मुखत्यार पाठवितां आले ह्मणजे तेवढ्यानेंच आह्मी सुखी होऊं व आमच्या देशाचा उत्कर्ष होईल. परंतु हा केवळ भ्रम आहे. तशांत सरकारचें काम ह्मटलें ह्मणजे लोकांच्या जीवाचें, स्वातंत्र्याचें आणि मालमत्तेचें संरक्षण करणें या पलीकडे कांहीं असेल असें वाटत नाहीं. ह्मणून सरकारानें कसें जरी लोकहिताचे कायदे केले तरी त्यांवरून सक्तीनें लोकांस असें सांगतां येत नाहीं कीं अमकी अमकी गोष्ट चांगली आहे ती तुह्मी करा, न केल्यास आह्मी तुह्मांस शिक्षा करूं. चोरी, मारामारी आणि खून वगैरे अपराध करूं नये हें सांगण्यास कायद्यांत आधार आहे आणि सदरील अपराध करणारांस पीनलकोडाप्रमाणें शिक्षाही करतां येते. परंतु तुह्मी विद्या शिका, उद्योग करा, व्यापार करा, आणि परस्परांशीं बंधुत्वाचें नातें ठेवा वगैरे गोष्टी सांगण्यास कायदा नाहीं आणि तसें न करणारांस कायदेशीर शिक्षाही करवत नाहीं. ह्मणून राजा कसाही न्यायी, दक्ष, व पापभीरू असला तर त्यापासून प्रजेचें उत्तम प्रकारें पालन होईल, त्यांच्या जीवास, स्वातंत्र्यास, किंवा मालमत्तेस कोणच्याही प्रकारें नुकसान होणार

नाहीं; परंतु याहून कांहीं विशेष होईल असें वाटत नाहीं. आळशी लोकांचा आळस कमी होणार नाहीं, उधळे लोकांचा उधळेपणा तसाच राहील, आणि मद्यपी वगैरे दुर्व्यसनी लोकांचें दुर्व्यसनही जाणार नाहीं. ही सुधारणा कायदेकाउन्सिलें स्थापिल्यानें किंवा पार्लमेंट सभेचे हक्क मिळाल्यानें होत नसतें. हें काम सरकारचें नव्हे. याला लोकांनींच मदत केली पाहिजे. प्रत्येक मनुष्यानें निरालस्य होऊन उद्योग केला पाहिजे; उधळेपणा टाकला पाहिजे; आणि आपल्या सर्व इच्छा स्वाधीन ठेवून हरएक प्रकारें नीतीस अनुसरून स्वतांचें वर्तन ठेवलें पाहिजे. अशानें मात्र आपलें व देशाचें पाऊल कांहीं पुढें पडण्याचा संभव आहे.

'यथा राजा तथा प्रजा' अशी एक आपल्या भाषेंत ह्मण आहे. ह्मणजे जसा राजा तशी त्याची प्रजा, अर्थात् राजा जर सद्गुणी व प्रजेचें योग्य रीतीनें पालन करणारा आहे तर त्याची प्रजाही सद्गुणी व विचारशील होणार आहे; परंतु राजाच जर दुष्ट व कर्मभ्रष्ट झाला तर ती प्रजाही पण त्याच मासल्याची होते. हें ह्मणणें जरी बहुतेक अंशीं खरें दिसतें, तरी नीट विचार केल्यास आपली अशी खात्री होईल कीं 'यथा राजा तथा प्रजा' असें न ह्मणतां 'यथा प्रजा तथा राजा' असें ह्मटल्यास त्यांतच सत्याचा अंश विशेष येणार आहे. ह्मणून त्या ह्मणण्याचाच आपण थोडासा विचार करूं. राजा उत्तम प्रकारचा आहे आणि तो प्रजेच्या हिताकरतां फार झटत असून प्रजा जर त्याच्या बरोबरीची नाहीं, तिला जर आपलें हित अहित समजत नाहीं, तर त्या राजाच्या चांगुलपणाचा खचित व्हावा तसा उपयोग होणार नाहीं. आळशी, दुष्ट,



व्यसनी व कावेबाज लोकांस मोठमोठे हक्क देतां येत नाहींत; त्यापासून राज्यास अपकारच होणार आहे. सुधारलेल्या लोकांप्रमाणें त्यांस वागविणें हें देखील कांहीं अंशीं बरोबर नाहीं. कारण त्यांच्या योग्यतेप्रमाणेंच त्यांची व्यवस्था केली पाहिजे. परंतु तोच राजा जर दुष्ट व जुलुमी आहे, आणि प्रजा हुशार असून स्वहित जाणणारी आहे तर ती अशा [illegible]ाचा जुलूम फार दिवस चालू देणार नाहीं, आणि [illegible]च्या इच्छेबाहेर त्याचें वर्तनही सहसा होणार नाहीं. इंग्रज लोकांचें राज्य पाहिलें असतां आज पुष्कळ ठिकाणीं आहे, परंतु त्यांची राज्य करण्याची पद्धत निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या प्रकारची आहे. राज्यकर्ते तर तेच, परंतु इंग्लंडांतील लोकांस जे हक्क आहेत ते या देशांत आह्मांला नाहींत, आह्मांला जे कांहीं थोडे बहुत आहेत ते आफ्रिकेंतील शिद्दी लोकांस नसतील आणि याचें कारणही उघडच आहे. योग्यता पाहून मुशाहिरा. आमची आज पार्लमेंट सभेंत बसण्याची योग्यता नाहीं ह्मणूनच तो अधिकार अद्यापि आह्मांस मिळत नाहीं; योग्यता असती तर आमच्या राज्यकर्त्यांनीं तो अधिकार आह्मांस कधींच दिला असता, किंबहुना तो आह्मींच घेतला असता. यावरून हें उघड आहे कीं सुधारणेच्या संबंधानें लोकांचें पाऊल जर मागें आहे आणि राज्यकर्ते कांहीं पाउलें पुढें आहेत तर ते त्यांस आपल्या बरोबरीस ओढून मागें आणतात. परंतु

१. याच नियमास अनुसरून नामदार शेट दादाभाई नवरोजी यांची या सालीं पार्लमेंट सभेंत निवड झाली हें उघड आहे. शेटजींची योग्यता व सतत उद्योग हींच त्यांस उपयोगीं पडलीं हें एथें सांगितलें पाहिजे असें नाहीं.

जेथें लोकांचें पाऊल पुढें, तेथें ते स्वतांचे हक्क मिळविण्यास काय काय प्रयत्न करतात आणि तेथील राजांचा जुलूम व बंडाई हीं कितपत चालतात हें इंग्लंड देशाचा इतिहास वाचणारांस ठाऊकच आहे. म्हणून या इंग्रजी राज्यांत कित्येकांच्या मतें जर आपणास कांहीं त्रास सोसावे लागत असले, तर त्याजबद्दल सरकारास टपका देतां नये. त्याजबद्दल सर्वस्वी दोषी आम्हीं आहों. असो, जशी ज्यांची योग्यता त्याप्रमाणें त्यांस कमी ज्यास्ती हक्क मिळणार आहेत. उद्योगी हुशार व प्रामाणिक अशा लोकांवर राज्यकर्त्यांचा पूर्ण विश्वास, म्हणून ते त्यांस चांगल्याच रीतीनें वागवितात. परंतु जे अविचारी, आपमतलबी, खुनशी व लबाड, अशा लोकांपासून राज्यकर्त्यांसही भीतीच म्हणून त्यांजकरतां कायदेही तसेच कडक करावे लागतात. म्हणून देशाची संपत्ति व मातब्बरी जाणणें झाल्यास तिकडचे लोक कोणत्या प्रकारचे आहेत हें समजणें अवश्य आहे. केवळ सैन्य मोठें किंवा आरमार मोठें असलें म्हणजे देशाची मातब्बरी विशेष होत नाहीं. कारण, देश म्हटला म्हणजे दुसरें काय आहे? देश म्हणजे देशांतील लोक—स्त्रिया व पुरुष—आणि त्यांची जर प्रत्येकीं सुधारणा झाली आहे, त्यांचा जर उत्कर्ष होत आहे, तर देशाचीही सुधारणा व उत्कर्षच होईल हें निःसंशय आहे.

देशांत उद्योग, उत्साह व प्रामाणिकपणा वगैरे सद्गुणांची वृद्धि होत असली म्हणजे देशाचा उत्कर्ष व भरभराट असते; परंतु जेथें यांचा अभाव, जेथें यांची कमताई, जेथें लोकांचें केवळ आपल्या स्वार्थावर लक्ष, आणि जें सर्व दुर्गुणाचें माहेरघर, अशा ठिकाणचा संपत्ति स्थिर राहत नाहीं आणि



तो देश लौकरच भिकेस लागतो. देशांत वेळोवेळीं लोकांवर जीं नानाप्रकारचीं संकटें गुदरतात, त्यांचें मूळ म्हटलें म्हणजे बहुतकरून लोकांचा अनाचार होय. त्यांचा प्रतीकार अल्पस्वल्प उपायांनीं होत नाहीं. कदाचित् झालाच आणि तीं संकटें एकवार नाहींशीं झालीं तर त्यांच्या ठिकाणीं दुसरीं उभीं राहतात आणि त्यांचा जोर पूर्वीपेक्षां विशेष होतो. त्यांचा समूल उच्छेद करणें झाल्यास लोकांचें वर्तन सुधारलें पाहिजे, आणि देशांतील अनाचार अगदीं नाहींसा केला पाहिजे. हें खरें आहे तर जे लोक आपल्या सद्वर्तनानें दुसऱ्यास सन्मार्गानें जाण्याचा कित्ता घालून देतात आणि त्यांस कांहींना कांहीं उद्योगास लावतात तेच देशाचे खरे पुरस्कर्ते असें म्हटलें पाहिजे. त्यांचा खरा देशाभिमान आणि त्यांची खरी देशाविषयीं कळकळ. परंतु असें न करतां राजदरबारांत व मोठमोठ्या सभांतच ज्यांची नुसती धामधूम आणि देशकल्याणाचा जे मोठा आव मात्र घालतात त्यांचा देशाभिमान खोटा, त्यांची देशप्रीति खोटी, ते खोटे, आणि त्यांची करणीही खोटी. देशकल्याणाच्या कामांत ते केवळ नामधारी होत.

राजा कसाही असला तर तेवढ्यानेंच प्रजेच्या सुखदुःखांत फारसें अंतर पडत नाहीं. प्रजेचें सुखदुःख व उत्कर्षअपकर्ष हीं त्यांच्या स्वतांच्या वर्तनावरच अवलंबून असतात. जुलमी राजा असला म्हणजे लोकांस एका प्रकारचें दास्य भोगावें लागतें ही गोष्ट जरी ख़री आहे तरी त्यापासून फारसें नुकसान होत नाहीं. परंतु लोकच जर अविचारी आहेत, आणि कामक्रोधादि षड्रिपु त्यांजवर पूर्ण अंमल करीत असल्यामुळें त्यांचे ते केवळ दास बनले आहेत तर

अशी स्थिति मात्र फार भयंकर समजली पाहिजे. तींतून सुटका होणें कठीण. अशा निकृष्टावस्थेस पोंचलेल्या लोकांस कसाही सौम्य राजा मिळाला आणि त्यांच्या हिताकरतां किती जरी त्यानें प्रयत्न केले, तरी ते सर्व निष्फळ होत. त्यांच्या स्थितींत काडीचा देखील फेर पडणार नाहीं आणि त्यांचें तें दास्यही जाणार नाहीं. ह्मणून देशाची भरभराट सरकारावरच अवलंबून आहे असा जोंपर्यंत लोकांचा समज राहील तोंपर्यंत कायदेकाउन्सिलांतून कसेही लोकहिताचे कायदे झाले, राज्यांत कितीही घडामोडी झाल्या, एक राजा जाऊन दुसरा राजा आला तरी त्यापासून देशास आज कोणताच फायदा होणार नाहीं. खरोखर आपली सुधारणा व्हावी आणि देश संपन्न व्हावा हें जर इष्ट आहे तर लोकांनीं चालू असलेला आपला वर्तनक्रम सोडला पाहिजे; आपलें आचरण शुद्ध व निष्कलंक ठेवलें पाहिजे; आणि असें होईल तरच देशांत सर्वत्र स्वस्थता होऊन परस्परांशीं स्नेहभाव विशेष होईल, विश्वास वाढेल, आणि देशांतील उद्दीमव्यापारास उत्तेजन मिळेल. **जॉनस्टुअर्ट मिल्ल** या नांवाचा एक विद्वान पंडित होऊन गेला त्याचेंही असेंच ह्मणणें होतें. त्यानें एका ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, राज्यांत पराकाष्ठेचा जरी जुलूम असला, तरी तेथील लोक जर खबरदार आहेत, त्यांचें पाऊल जर आडमार्गानें जात नाहीं, त्यांस जर खरी स्वतंत्रता ह्मणजे काय हें समजत आहे, त्यांचें आचरण जर पवित्र आहे, तर अशा जुलुमापासून त्यांच्या स्वतंत्रतेंत व सुखांत किंचितही अंतर पडणार नाहीं. त्यांची भरभराटच होईल. परंतु जेथें याच्या उलट प्रकार झाला आहे, लोक अज्ञानामुळें उन्मत्त झाले आहेत,



आपण कोण व करतों काय याचें ज्यांस भान नाहीं, आपली स्थिति काय व शेवटीं परिणाम कसा होईल याचा ज्यांस विचार नाहीं, अशा ठिकाणीं जुलुम नसला तरी तें खरें जुलुमी राज्य, तेथील स्वतंत्रता खरी नष्ट झाली, आणि ते लोक खरे ताबेदार असें ह्मटलें पाहिजे.

देश संपन्न कसा होईल याजबद्दल लोकांचे विचार कांहींसे विलक्षण असतात. कोणाला असें वाटतें कीं आपल्यावर सार्वभौम राजाची सत्ता असावी, जुना बादशाही अंमल सुरू व्हावा, बादशाहाची सत्ता अपरिमित असावी, त्याच्या हातीं सर्व अधिकार द्यावा आणि त्याचे आपण केवळ बंदे चाकर व्हावें, ह्मणजे आपला देश मोठ्यांत गणला जाऊन आपल्यास परचक्राची भीती राहणार नाहीं, आणि तेणेंकरून आपली भरभराट होईल. कोणी ह्मणतात प्रस्तुतचे राज्यकर्ते जाऊन दुसरे राज्यकर्ते यावे. **रशिअन** किंवा **अमेरिकन** लोक आले तर ते आह्मांस चांगल्या रीतीनें वागवितील असाही पुष्कळ लोकांचा समज आहे. कोणी ह्मणतात, पीनलकोडांत कांहीं फेरफार करावा. याप्रमाणें बसल्या ठिकाणीं प्रत्येकाचें कांहींना कांहीं ह्मणणें आहेच. परंतु सर्वांचा मतलब जर पाहिला तर एक कीं त्यापासून आह्मां स्वतांस कोणच्याच प्रकारें श्रम पडूं नयेत, जें कांहीं करणें असेल तें परभारें इंग्रज, फ्रेंच किंवा अमेरिकन लोक यांनीं पाहून घ्यावें, आह्मीं आळसांत व ख्यालीखुशालींत दिवस काढावे, उद्योग करूं नये, आणि सुखी तर व्हावें. ही आमची खोटी इच्छा कितपत सफळ होईल हें उघडच दिसत आहे. बादशाही अंमल झाला ह्मणजे आह्मी सुखी होऊं हें ह्मणणें केवळ भ्रांतिमूलक आहे. त्याचा अनुभव

आपल्यास अद्यापि घेणेंच आहे. बादशाहाच्या हातीं सर्व सत्ता गेली ह्मणजे तो आपल्यास केवळ सूत्रबाहुल्याप्रमाणें नाचविणार आहे; आणि आमचें सर्व शहाणपण नाहींसें होऊन आह्मांवर हरएक प्रकारच्या जुलुमाची मात्र सुरवात होणार आहे. बादशाहा या नांवास भुलून त्याजवर अशा प्रकारें आपला सर्व भरिभार घालणें ह्मणजे आपलें नीचत्व आणि दास्य हीं कबूल केल्याप्रमाणें होतें. या प्रकारचे स्वातंत्र्याचा नाश करणारे घातकी विचार लोकांत प्रसिद्ध करण्यापेक्षां स्वोद्योग व स्वाभिमान यांचाच विशेष फैलाव केल्यास त्यापासून देशास पुष्कळ फायदा होणार आहे. आणि एकवार यांची लोकांस गोडी लागली ह्मणजे आळस व परतंत्रता हीं सहज देशांतून नाहींशीं होतील आणि देशकल्याणाचा जो आपला इष्ट हेतु तोही सिद्धीस जाईल इंग्रज लोकांस अशा प्रकारचे हे स्वतंत्र विचार फार प्रिय असतात. यामुळें आपल्या देशाचा राज्यकारभार एकच मनुष्यावर न सोंपवितां राज्याचा होईल तेवढा कार्यभाग स्वतां उचलण्यास ते नेहमीं सिद्ध असतात. ह्मणून या कामीं त्यांचेंच अनुकरण करणें हें आपल्यास विहित आहे.

**रुशिअन** किंवा **अमेरिकन** लोक या देशांत आले अथवा इंग्रज लोकांनींच या देशांत आपलें ठाणें घातलें आणि राणीच्या घराण्यांतील एकादा पुरुष इकडे येऊन राज्य करूं लागला तर या देशाचें दारिद्र्य जाईल आणि आह्मी सुखी होऊं असेंही पुष्कळ लोकांस वाटत असतें. परंतु या ह्मणण्यांत देखील कांहीं अर्थ असेल असें ह्मणवत नाहीं. या संबंधानें **वुइलिअम डार्गन** या नांवाच्या गृहस्थानें, **डब्लिन** एथें कलाकौशल्याचें पहिलें प्रदर्शन झालें, त्याच्या



अखेरीस जें भाषण केलें तें एथें उतरून घेण्याजोगें आहे. डार्गन हा आयर्लंड देशांत राहणारा असून त्याच्यामध्यें देशाभिमान व देशप्रीति हे गुण उत्तम प्रकारें वास करीत असत. तो ह्मणतो:-"मी खरोखर सांगतों कीं देशाचें किंवा लोकांचें स्वातंत्र्य हे शब्द माझ्या कानीं पडले ह्मणजे माझ्या देशाची व माझ्या देशबांधवांची मला आठवण होते आणि हा माझा देश, व हे माझे देशबंधु स्वतंत्र कसे होतील हे विचार माझ्या मनांत येतात. पुष्कळांना असें वाटतें कीं अमेरिकन लोक किंवा दुसरे कोणी आमच्या मदतीस आले ह्मणजे आमचें स्वातंत्र्य आह्मांस मिळेल आणि त्यांच्या सहवासानें आमची बढती होईल. सुधारलेल्या लोकांच्या सहवासानें आमची सुधारणा होईल ही गोष्ट जरी मला पुष्कळ अंशीं मान्य आहे, तरी माझी अशी पक्की खात्री आहे कीं रोजगारधंद्यांच्या संबंधानें आमचें जें खरें स्वातंत्र्य तें मिळविणें आमच्याकडेसच आहे. त्याला दुसऱ्या लोकांची मदत नको. तें काम आमचें आहे आणि त्याजकरतां आह्मीं स्वतां उद्योग केला पाहिजे. आळस व उदासीनपणा टाकला पाहिजे आणि असें केलें ह्मणजे खचित या कामांत आह्मांस यश मिळणार आहे. उद्योग तर आमचा थोडा बहुत चालू आहेच पण तो नेहेमी तसाच चालविला पाहिजे. मध्यें कांहीं संकट आल्यास त्यास भितां नये. आणि अशा रीतीनें झटून सतत मेहेनत केल्यास पृथ्वीच्या पाठीवरील कोणत्याही राष्ट्राची बरोबरी करण्यास आह्मांस फार वेळ लागणार नाहीं. आमचे रोजगारधंदे वाढतील, आमची लक्ष्मी स्थिर व वर्धमान होईल, आणि आह्मीं सुखी होऊं."

या जगांत मनुष्याच्या सुखाकरितां ज्या कांहीं अनेक

सोयीवार गोष्टी दिसून येतात त्या सर्व एकदम झाल्या नाहींत. त्या होण्याकरतां पिढ्यानुपिढ्या लोक खपत आहेत आणि जी आपल्यासमोर आज थोडीबहुत सुधारणा दिसून येते, ती एका मनुष्याच्या हातून किंवा एका देशाच्या लोकांपासून झाली नाहीं. ती होण्याकरतां पुष्कळ लोकांची व पुष्कळ जातीविशेषांची मदत लागली आहे. तसेंच केवळ विद्वान पंडितांच्याच साहाय्यानें हें काम झालें नाहीं. रानांत किंवा शेतांत खपणारा कुणबी, सुतार, सोनार, लोहार, कोष्टी वगैरे सर्व लोकांची या कामास थोडीना थोडी मदत झाली आहे. आणि यामुळें आपल्या सभोंवतीं आज हा एवढा मोठा चक्रव्यूह रचलेला आपण पाहात आहों. राहण्याला मोठमोठीं घरें झालीं, रस्ते झाले, विहिरी झाल्या, आगगाडी झाली, तारायंत्र झालें, गिरण्या झाल्या, छापखाने झाले, आणि दुसरीं पुष्कळ मनुष्यांच्या सुखाचीं साधनें झालीं. हें सर्व उद्योगाचें फळ. मनुष्यानें उद्योग केला नसता तर आज या सर्व सुखास आह्मी अंतरतों. परंतु हा सर्व उद्योग केवळ आमचाच नव्हे. आमच्या पूर्वजांनींही आमच्याप्रमाणेंच उद्योग केला आणि त्याचेंही फळ आज आह्मांसच मिळत आहे. ते गेले तेव्हां त्यांनीं मिळविलेली सर्व संपत्ति आमच्या स्वाधीन केली, आणि हा क्रम जगाच्या आरंभापासून चालला आहे ह्मणून या एकुणीसाव्या शतकांत ही इतकी सुधारणा झाली. आतां आमचें कामही तेंच. आलेली संपत्ती सांभाळून आणि तींत यथाशक्ति भर घालून, ती सर्व पुढें येणाऱ्या लोकांच्या स्वाधीन केली पाहिजे. परंतु हें काम स्वस्थ बसून होत नाहीं; याला खरोखर मेहनत केली पाहिजे; उद्योग केला पाहिजे; नुसत्या



तोंडच्या लांब लांब पोकळ गप्पा मारून कांहीं एक होणें नाहीं.

दुसऱ्यावर फारसें अवलंबून न राहतां झटून स्वतां उद्योग करण्याच्या कामांत इंग्रज लोकांची फार प्रसिद्धि आहे. त्यांचा देश व ते स्वतां कांहीं काळापूर्वीं अगदीं रानटी स्थितींत होते. परंतु केवळ उद्योगाच्या जोरावर अल्प काळांत त्यांनीं आपली इतकी कांहीं सुधारणा केली कीं पृथ्वीच्या पाठीवर त्यांची सत्ता आज सर्वत्र पसरली आहे. त्यांच्या राज्यावर सूर्याचा प्रकाश कधींही नाहींसा होत नाहीं. चौदा विद्या चौसष्ट कला वगैरे सर्व कांहीं त्यांच्या घरीं हल्लीं पाणी भरताहेत असेंही ह्मटल्यास फारसा बाध येणार नाहीं, आणि दिवसेंदिवस त्यांची भरभराटच विशेष होत आहे. हें त्यांचें वैभव त्यांच्या उद्योगाचेंच फळ असें ह्मटलें पाहिजे. त्यांत नशीबाचा फारसा वाटा नाहीं; कारण उद्योगासच त्यांच्या देशांत फार मान आहे. आणि हा उद्योग ह्मटला ह्मणजे जे केवळ मोठमोठाले लोक, सर्व कामांत लोकांचे जे पुढारी, ज्यांचीं नावें जगजाहीर अशांचाच नव्हे; तर जे गरीबगुरीब, मध्यम आणि कनिष्ठ स्थितींतले लोक, ज्यांचीं नांवें देखील कधीं कोणास माहित नाहींत अशांचाही या सत्कृत्यांत बराच अंश आहे. इतिहासादि ग्रंथांत लढाईच्या संबंधानें **ऑस्मन् पाच्छासारख्या** शूर सरदारांचींच नांवें जरी दृष्टीस पडतात, तरी अप्रसिद्ध जे शिपाई, त्यांच्यामध्येंही शौर्य साहसादि वीरांस भूषण देणारे गुण कमी असतात असें नाहीं. ते जर तलवारबहादुर आहेत तरच बहुतकरून शत्रूचा पाडाव होत असतो. आणि पाहिलें असतां, हा संसार किंवा हें जग ही पण एक लढाईच

आहे. या लढाईंत काम, क्रोध, आळस वगैरे शत्रूंचा आ-ह्मांस नाश कर्तव्य आहे. आणि हें काम केवळ मोठमोठ्या लोकांच्याच हातून होत नाहीं. यःकश्चित् ह्मटलेल्या लो-कांनीं देखील या महान् महान् शत्रूंचा पराभव करून आ-पलें व आपल्या देशाचें वर्चस्व स्थापित केलें आहे. आतां जे मोठे ह्मणजे मोठ्या कुळांत ज्यांचा जन्म, संपत्ति ज्यांची मोठी, लौकिक ज्यांचा मोठा, अशांचीं मात्र लोकांनीं चरित्रें लिहून ठेविलीं आणि यामुळें त्यांची नांवें अमर झालीं. परंतु जे गरीब, कांहीं निरुपायाच्या कारणामुळें जे अप्रसि-द्धच राहिले-आणि अशांचींच संख्या फार-अशांचीं चरित्रें कोणीं लिहिलीं नाहींत आणि यामुळें त्यांचीं नांवेंही कोणास माहित नाहींत. ह्मणून त्यांपासून देशास कमी फायदा झाला असें नाहीं. अशा लोकांचाच हरएक प्रकारचा उ-द्योग त्यांच्या स्वतांच्या व देशाच्या सुधारणेस आणि भर-भराटीस पुष्कळ अंशीं कारण झाला व होत आहे. आणि हें उघडच आहे; कारण, कसा जरी विपन्न मनुष्य असला तरी जर तो कांहींना कांहीं योग्य उद्योग करून आपलें व कुटुंबाचें संरक्षण करीत आहे, दुसऱ्याची एक अर्धी देखील लबाडीनें मिळविण्याची त्याची इच्छा नाहीं, कोणतेंही त्याला दुर्व्यसन नाहीं, कोणाचें कर्ज नाहीं, आचरण शुद्ध व नि-ष्कलंक, तर अशा मनुष्यापासून देशास दोन प्रकारचा फा-यदा होत असतो. एक तर त्यापासून कोणाचें निंदानुक-सान होत नाहीं-आणि या दिवसांत हा लहानसान फायदा नव्हे. दुसरा फायदा हा कीं आपल्या सद्वर्तनानें दुसऱ्यास सन्मार्गीं जाण्याचा तो एका प्रकारचा कित्ता घालून देतो; यापासून देशास जो कांहीं विलक्षण फायदा होतो तो के-



वळ तात्कालिक नव्हे तर वर्षानुवर्षें, पिढ्यानुपिढ्या आणि शतकानुशतकें त्याचा सतत अंमल चालत असतो.

आपण नेहेमीं असें पाहतों कीं उद्योगी व सद्गुणी मनु-ष्यांची संगत असली ह्मणजे लोक बहुधा आडमार्गानें जात नाहींत. अशांच्या संगतीपासून त्यांच्या मनावर एका प्रकारचा बोध होऊन ते सन्मार्गीं लागतात. सत्संगतीपासून अशा प्रकारचें हें जें आपल्यास शिक्षण मिळतें त्याचा व्य-वहारांत फार उपयोग आहे. परंतु याहूनही कुटुंबांतील माणसांच्या सद्वर्तनापासून आपल्यास जें शिक्षण मिळतें त्याची योग्यता फार. त्याचा आपल्या मनावर कांहीं वि-शेष जोरा असतो. चार चौघांत फिरल्यानेंही आपली पु-ष्कळ सुधारणा होते. रस्त्यांत, बाजारांत, देवळांत, आफि-सांत, गिरण्यांत, आणि जेथें जेथें लोकसमुदाय फार अशा ठिकाणीं नानाप्रकारचीं माणसें आपल्या पाहण्यांत येतात. त्यांतून कोणी उद्योगी, कोणी साहसी, कोणी सत्यप्रिय, कोणी अधर्मभीरु, कोणी कसे, कोणी कसे असल्यामुळें त्या सर्वांपासून आपल्यास कांहींना कांहीं शिकण्याजोगें असतेंच. हें ज्ञान शाळेंत गुरूजवळ अध्ययन केल्यानें मि-ळत नाहीं. तेथें जी कांहीं आपल्यास थोडीबहुत विद्या मिळते तिची यापुढें विशेष मातब्बरी दिसून येत नाहीं. ती केवळ ओनाम्यादाखल होते. तिची पूर्णता करण्यास अशा ज्ञानाची फार जरूर आहे. हें ज्ञान जर नाहीं तर ती सर्व विद्या केवळ अपूर्तीच राहते. हें जग ह्मणजे काय आहे व त्यांत आपलें कर्तव्य कोणतें हें समजण्यास याशिवाय दु-सरा मार्ग नाहीं. **बेकन**चेंही असेंच ह्मणणें आहे. तो ह्मणतो कीं आपण किती जरी विद्या संपादन केली, तरी तिच्यापा-

सून तिचा उपयोग कसा करावा हें समजत नाहीं. हें समजण्याकरतां चारचौघांत फिरलें पाहिजे, आणि त्यांच्या रीतीभाती व त्यांचा वर्तनक्रम हीं सर्व लक्ष लावून पाहिलीं पाहिजेत. इतिहासग्रंथ व मोठमोठ्या मनुष्यांचीं चरित्रें वाचल्यानेंही अशा प्रकारचा पुष्कळ फायदा होत असतो.

मोठमोठ्या मनुष्यांचीं व मुख्यत्वेंकरून सत्पुरुषांचीं चरित्रें लिहून ठेवण्याची आपल्या लोकांत फारशी चाल नाहीं. राजेलोकांच्या व **तुकाराम, रामदास** वगैरे साधुसंतांच्या कांहीं जुन्या बखरी आपल्या पाहण्यांत येतात. परंतु अलीकडे ही चाल अगदीं नाहींशी होत चालली आहे. **इंग्रज** लोकांत हा संप्रदाय विशेष असल्यामुळें त्यांच्या भाषेंत अशा प्रकारचे ग्रंथ पुष्कळ आहेत व त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. अशा ग्रंथांपासून लोकांस फार उपयोग होतो. त्यांपासून पुष्कळ नव्या नव्या गोष्टी समजतात. त्यांतून कांहीं ग्रंथांची योग्यता तर फारच आहे. या जगांत आपलें कर्तव्य काय आहे व कोणच्या प्रकारचें वर्तन ठेवल्यास स्वतांचें व देशाचें हित होईल हें त्यांपासून आपल्यास समजतें. त्यांत पुष्कळ उदाहरणें अशीं सांपडतात, आणि तीं वाचून आपल्या मनाची पक्की खात्री होते कीं मनुष्यानें जर निराश न होतां सतत उद्योग केला, परिश्रम केले, त्यांत कांहीं कमताई केली नाहीं, आणि व्यवहार चोख ठेवला, तर त्याची योग्यता आणि थोरवी हीं लोकांच्या नजरेस सहज येतात, आणि अशा मनुष्यास कोणतेंही काम कठीण जात नाहीं. तसेंच किती जरी गरीब मनुष्य असला परंतु स्वाभिमान ह्मणून जर त्याला कांहीं माहीत आहे, तर दुसऱ्यावर फारसें अवलंबून न राहतां स्वतांच्या



उद्योगानेंच त्याचें तें दारिद्र्य जाऊन गांठीस दोन पैसे होतात व लोकांत त्याची मानमान्यता होते. अशीं उदाहरणें डोळ्यासमोर पाहून किंवा पुस्तकांत वाचून उद्योग न करतां आळसांतच आपले दिवस काढणारा मनुष्य विरळा. दुसऱ्याचा उद्योग पाहून आणि असे आनुभविक ग्रंथ वाचून प्रत्येक मनुष्यास उद्योग करण्याविषयीं इच्छा सहज उत्पन्न होते आणि मग अर्थातूच त्यापासून त्याचा उत्कर्ष होतो.

**इंग्लंड** देशांत पुष्कळ महान् महान् विद्वान पंडित होऊन गेले. त्यांची बुद्धि जाज्वल, त्यांची विचारशक्ति मोठी, आणि त्यांचा उद्योगही विलक्षण, यामुळें त्यांतून कोणी प्रसिद्ध शास्त्रवेत्ते झाले, कोणी भाषाभिज्ञ झाले, आणि कोणी कलाकौशल्यांत निपुण झाले. हे सर्व घरचे श्रीमंत किंवा मोठ्या कुळांतले असून या सर्वांस शाळेंत किंवा मोठमोठ्या विद्यालयांत जाऊन विद्या शिकण्याचें सामर्थ्य होतें असें नाहीं. कोणी कोणी तर मूळचे अगदीं गरीब असून शेतांत किंवा गिरण्यांत खपून आपला चरितार्थ चालवीत असत. परंतु फावल्यावेळेस मेहेनत करून आपला बुद्धिप्रभाव त्यांनीं लोकांस दाखविला. याप्रमाणें जे अगदीं निराश्रित त्यांनीं दुसऱ्याच्या मदतीची फारशी परवा न करतां, आपल्या उद्योगाच्या जोरावरच स्वतांस मोठें ह्मणवून घेतलें आणि अगदीं दरिद्री होते ते धनाढ्य होऊन बसले. त्यांचा उद्योग विलक्षण यामुळें मध्यें मोठमोठीं विघ्नें आलीं तरी तीं त्यांनीं न जुमानतां आपला क्रम तसाच चालू ठेवला. कांहीं कांहीं प्रसंगीं तर तीं विघ्नेंच त्यांस सहायकारी झालीं असेंही ह्मणतां येईल; कारण त्यांपासून त्यांची उमेद तर

कमी झाली नाहीं परंतु उलट त्यांचा प्रयत्न मात्र विशेष झाला. त्यांच्या उद्योगास बळकटी आली आणि यामुळें पूर्वीपेक्षां तो अधिक फलद्रूप होऊं लागला. याप्रमाणें अनेक संकटें सोसून पुढें नांवालौकिकास आले असे त्यांच्यामध्यें पुष्कळ लोक होऊन गेले व आहेत. आणि यावरूनच करणारांस कोणतेंही काम अशक्य नाहीं अशा अर्थाची त्यांच्यामध्यें एक ह्मण पडली आहे. ती शब्दशः खरी आहे. तिचा अनुभव आमच्या लोकांनीं घ्यावा हें त्यांस विहित आहे. या ह्मणण्याच्या सत्यासत्यतेबद्दल पुढें पुष्कळ उदाहरणें येतील. त्यांजविषयीं प्रत्येक मनुष्यानें नीट विचार करून तदनुरोधानें चालण्याचा निदान प्रयत्न तरी करावा ह्मणजे आपल्या या दुर्दैवी **भारतवर्षाचें** दैन्य जाण्यास फार वेळ लागणार नाहीं.

**जेरेमी टेलर** ह्मणून एक विद्वान पंडित होऊन गेला. त्यानें धर्मसंबंधी पुष्कळ ग्रंथ लिहिले आहेत. त्यांची विषयाच्या व भाषेच्या संबंधानें योग्यता मोठी असल्यामुळें त्यांस आजकाल विशेष मान आहे. **रिचर्ड आर्कराइट** हें नांव तर इंग्लंडांत लहान थोर सर्वांस माहित आहे. इंग्लंडांत कापूस पिंजण्याचें यंत्र पहिल्यानें यानें तयार केलें आणि कापडाच्या गिरण्याची सुरवातही पण यानेंच केली. **चीफ जस्टिस लॉर्ड टेंडर्डन** ह्मणून एक न्यायाधीश होऊन गेला. याची योग्यताही ह्मटली ह्मणजे लहानसान नव्हे. तसेंच **टर्नर** या नांवाचा एक प्रसिद्ध चितारी होऊन गे[ला]. तो चित्रविद्येंत इतका कांहीं निपुण होता कीं त्याच्या हातचीं चित्रें अद्याप मोठमोठ्या ठिकाणीं पाहण्यांत येतात. आतां सांगायाची गोष्ट ह्मणून एवढीच कीं हीं सर्व पहिल्यानें न्हा-



व्यांचीं पोरें. कांखेंत धोकट्या मारून यांनीं हजामती केल्या. परंतु यांची बुद्धी आणि यांचा उद्योग विलक्षण यामुळें हे एवढ्या मोठ्या योग्यतेस चढले.

**शेक्सपिअर** कवीची तर सर्वत्र प्रसिद्धि आहेच. त्याचे नाटकग्रंथ पुष्कळ असून त्यांची योग्यताही कांहीं विशेष आहे. विद्वज्जनांस ते मान्य असल्यामुळें **युरोपांत** त्यांचीं अनेक भाषांतरें झालीं आहेत. या कवीच्या सन्मानार्थ विद्याप्रियजनांनीं संगमरवरी दगडाचे ठिकठिकाणीं त्याच्या सारखे पुतळे करून ठेवले आहेत. एवढी त्याची योग्यता परंतु तो कोण व त्याचा धंदा काय होता याचा अद्याप बरोबर निकाल होत नाहीं. यावरून उघड दिसतें कीं त्याचा अगदीं हलक्या कुळांत जन्म झाला असावा. एवढें मात्र समजतें कीं त्याचा बाप धनगर असून खाटक्याचा धंदा करीत असे, आणि कित्येकांच्या मतें **शेक्सपिअर** देखील लहानपणीं लोंकर पिंजण्याचें काम करीत असे. मोठा झाला तेव्हां कोणी ह्मणतात कीं तो लहान पोरांच्या शाळेंत पंतोजी होता, आणि कोणी ह्मणतात कीं तो एका सावकाराजवळ कारकून होता; आणि खरोखरीच त्याच्यामध्यें एकच कसब नव्हे तर सर्व कांहीं कसबें भरलीं होतीं. खलाशांची भाषा बोलूं लागला तर कोणाला असें वाटणार नाहीं कीं हा ह्मणजे जातीचा खलाशी नव्हे, आणि यावरूनच कित्येकांचें ह्मणणें कीं तो खलाशी असावा. धर्मसंबंधीं गोष्टी करूं लागला ह्मणजे तिकडे तरी याची लेखणी अडावी, परंतु तिकडे याचें वाक्पांडित्य इतकें कांहीं सुरू होतें कीं कांहीं पाद्री लोक त्याला आपल्यामध्यें ओढूं पाहतात. त्यांच्या मतें हा कोणी तरी धर्मो-

पदेशकाचा मुलगा असावा किंवा निदान त्याच्या हाताखाली
यानें दीक्षा तरी घेतली असावी. तसेंच घोड्यांची पारख
याला उत्कृष्ट यामुळें हा घोडे विकणारा असावा असेंह
कित्येकांचें ह्मणणें पडतें. आतां बोलून चालून तो नाट
कीच तेव्हां इतकें हे जे त्यानें धंदे केले हेंही पण त्यां
एक नाटकच केलें असें ह्मटलें पाहिजे. जें जें सोंग त्यां
घेतलें त्याची त्यानें उत्तम प्रकारची बतावणी केली. त्यां
कोणतीही कमताई राहूं दिली नाहीं. यामुळें त्याच्या पुस्त
कांत हें अलौकिक ज्ञानभांडार दिसून येतें. कांहीं जर
ह्मटलें तरी त्याची विचारशक्ति आणि त्याचा उद्योग ह
विलक्षण होतीं ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे, आणि
यामुळेंच त्याला जरी आज पुष्कळ वर्षे होऊन गेलीं तर
**इंग्रज** लोक प्रस्तुतकालीं त्याच्या ग्रंथांस इतका कांहीं
मान देतात आणि त्याचे ग्रंथ ते इतक्या मोठ्या आस्थेनें
वाचतात कीं त्यांची सांप्रतची सुधारणा होण्यास ते ग्रं
पुष्कळ अंशीं कारण झाले व होत आहेत.

**बिंडले** ह्मणून एक **इंजिनीअर** ( यंत्रशास्त्रांत वाकब
होऊन गेला. इंग्लंडांत जे मोठमोठे कालवे आहेत ते बहु
तकरून सर्व यानें बांधले. तसेंच **कुक** ह्मणून एक नावाड
होऊन गेला. त्यानें आपल्या देशाकरतां पुष्कळ लढाय
मारल्या आणि **अमेरिकें**तील **क्केबेक** वगैरे प्रांत काबीज
केले. **बर्न्स** ह्मणून एक कवि झाला. त्याचे लहान मोठे बरे
ग्रंथ आहेत. या सर्वांचा जन्म अगदीं हलक्या कुळांत झाल
यांचे आईबाप रस्त्यांत हेलपाटी करून आपला उदरनिर्वा
करीत असत. कवि **बेन्जॉन्सन, इंजिनीअर एड्वर्ड्**
आणि भूगर्भशास्त्रवेत्ता **ह्यू मिलर** हे मुळचे गवंडी. यां



हातांत थापी घेऊन स्वतां कांहीं दिवस गवंड्याचें काम केलें
आहे. **बेन्जॉन्सनची** तर अशी गोष्ट सांगतात कीं **लिं-
न्स इन्** ह्मणून कायदे शिकविण्याची जी मोठी शाळा
आहे ती बांधतेवेळेस एका हातांत पुस्तक व दुसऱ्या हा-
तांत थापी घेऊन तो काम करीत असे. सुतारांमधूनही
बरेच प्रसिद्धीस आले आहेत. **ह्यारिसन** याची लहान
मोठीं घड्याळें प्रसिद्ध आहेत. क्रोनॉमीटर ह्मणून एका प्र-
कारचें घड्याळ आहे. त्यांचा खलाशांस तारवावर फार
उपयोग होत असतो. तें पहिल्यानें यानें तयार केलें आणि
त्याजबद्दल सरकारांतून याला दोन लाख रुपये बक्षिस मि-
ळाले. **जॉन हंटर** हा वैद्यकीच्या कामांत निपुण झाला.
इंद्रियविज्ञानशास्त्राची याला उत्तम प्रकारची माहिती होती.
तसेंच **प्रोफेसर ली** यानें तर बरेच दिवस सुताराचें काम
केलें. परंतु तशांतूनच फावल्या वेळेस त्यानें लाटिन,
ग्रीक, आरबी, व इब्री भाषांचें अध्ययन केलें आणि त्यांत
तो इतका कांहीं प्रवीण झाला कीं **ऑक्सफोर्ड युनिव-
र्सिटींत** सदरी भाषा शिकविण्याकरतां **प्रोफेसर**च्या जागीं
याची नेमणूक झाली. त्यानें तयार केलेले **आरबी** व **इब्री**
भाषांचे कोश आणि व्याकरणग्रंथ हल्लीं प्रसिद्ध आहेत.

कापड विणणारे कोष्टी यांच्यामधून **सिम्सन** या नां-
वाचा गणिती झाला. **डॉक्टर लिविंग्स्टन** याची तर पुष्क-
ळांस माहिती आहे. हा हल्लींच कांहीं वर्षांपूर्वी मरण
पावला. यानें **आफ्रिका** खंडांत फिरून पुष्कळ नवीन
शोध लावले आहेत. यामुळें **आट्लांटिक** महासागरां-
तून **हिंदू** महासगारांत, **केप आफ् गुड् होप** यास व-
ळसा न घालतां, **झांबीसी** आणि **कांगो** या दोन पूर्व व

पश्चिम वाहिनी नद्यांतून जाण्यायेण्याचा मार्ग सोपा होईल
असा अजमास आहे. हा व प्रसिद्ध कवि **टानाहिल** हे
पण मुळचे कोष्टीच होते. **क्लाउडले शावेल** हा इंग्लिश
आरमाराचा सेनापती होता. त्याचा पराक्रम मोठा यामुळें
त्याला ‘सर’ ही पदवी मिळाली होती. परंतु पाहिलें असतं
हा मुळचा चांभार. जोडे व बूट तयार करून यानें आपल
कसा तरी निर्वाह करावा. याशिवाय आणखी दुसरे पु
ष्कळ चांभार आपल्या उद्योगाच्या बळावर नांवालौकि
कास आले आहेत. **स्टर्जन** हा वीज ह्मणजे काय, ति
धर्म कोणते, ती कशी उत्पन्न करावी, आणि तिचा उपयो
काय हें पूर्णपणें जाणत असे. **साम्यूअल ड्र्यू** याचे नि
बंध पुष्कळांच्या पाहण्यांत आहेत. **क्वार्टर्ली रेव्ह्यू** ह्म
णून इंग्रजींत एक प्रसिद्ध त्रैमासिक पुस्तक निघत असतें
तें कांहीं दिवस **गिफोर्ड** या नांवाचा मनुष्य चालवीत
असे. **ब्लूमफील्ड** ह्मणून एक कवि होऊन गेला. **क्यारि**
आणि **मॉरिसन** हे पाद्री होते. ख्रिस्ती धर्माचा प्रसार कर
ण्याविषयीं यांनीं पुष्कळ श्रम केले. या सर्वांचा चांभा
रांच्या कुळांत जन्म झाला होता. यांशिवाय ब्यान्फ य
गांवीं अलीकडेच कांहीं वर्षांपूर्वीं एक चांभार प्रसिद्धीस
येऊन गेला. त्याचें नांव **टॉमस एड्वर्ड्स**. यानें आ
पला चांभारी चंदा चालवून बसल्या बसल्या सृष्टपदार्थवि
ज्ञानशास्त्राचा अभ्यास केला. त्यांत त्याची इतकी कांहीं
गति झाली कीं पूर्वीं माहित नव्हतें असें कांहीं शंखाकृ
प्राणी त्यानें शोधून काढले आणि हल्लीं ते त्याच्या नांवा
प्रसिद्ध आहेत. त्यांस ‘प्रानाइझाय एड्वर्ड्साय’ असें ह्मणता
ह्मणजे **एड्वर्ड्स** यानें शोधून काढलेले शंखाकृति प्राण



आतां राहिले दर्जीलोक ह्मणजे इंग्रजींत ज्यांना **टेलर्स** असें ह्मणतात. हे **टेलर्स** ह्मटले ह्मणजे इंग्रज लोकांत त्यांस फारसा मान नसतो. हे अगदीं दुर्बल, यांच्या हातून कोणतेंही मोठें काम होणें नाहीं असा त्या लोकांचा पुरा समज. यामुळें त्यांच्या मध्यें अशी एक ह्मण पडली आहे कीं ‘ नाइन् टेलर्स मेक वन् म्यान् ’ ह्मणजे नऊ जेव्हां दर्जी एका ठिकाणीं मिळावे तेव्हां त्यांनां एका मनुष्याचें सामर्थ्य येतें. परंतु अशा लोकांमधूनही बरेच पराक्रमी पुरुष निपजले आहेत. **जॉन स्टो** यानें पुष्कळ दिवस दर्ज्यांचें काम केलें. परंतु हल्लीं त्यानें तयार केलेले इतिहासग्रंथ प्रसिद्ध आहेत. **जॉन हॉक्सवुड** हा लहानपणीं एका दर्ज्याजवळ चाकरीस असे, तेथें त्याला पगार वगैरे कांहीं मिळत नव्हता. धन्याच्या घरीं दोन वेळ जेवून त्यानें सांगितलेली चाकरी करावी. असा क्रम कांहीं वर्षें चालला असतां, कांहीं कारणामुळें फ्रेंच व इंग्रज यांचा युद्धप्रसंग सुरू झाला, आणि कामाच्या निमित्तानें यालाही धन्याबरोबर तिकडें जावें लागलें. परंतु तेथें गेल्यावर **पोएटिअर्स** येथें जी मोठी लढाई झाली तींत त्यानें आपली तरवार अशी कांहीं गाजिवली कीं त्यावेळचा राजा **तिसरा एड्वर्ड** यानें त्याला ‘ **नाइट** ’ ही पदवी देऊन त्याच्या नांवास ‘ **सर** ’ हा किताब जोडला. आणि मग तो **सर जॉन् हॉक्सवुड्** या नांवानें प्रसिद्ध झाला. सेनापती **हॉब्सन्** याचीही अशीच चमत्कारिक गोष्ट सांगतात. **इंग्लंडच्या** दक्षिणेस **वाइट्** या नांवाचें एक बेट आहे. तेथें **बॉन्चर्च** या गांवीं हा लहानपणीं एका दर्ज्याजवळ काम शिकण्याकरतां ह्मणून राहिला होता. हा गांव समुद्रकिनाऱ्यावर

असल्यामुळें कांहीं लढाऊ तारवें एके दिवशीं या बेटाजवळून जात होतीं तीं एथून दिसूं लागलीं. तीं पाहण्याकरतां बंदरावर पुष्कळ लोकांची गर्दी झाली. यावेळेस **हॉब्सन्** हा दुकानांत कांहीं काम घेऊन बसला होता. त्याला ही बातमी समजली. त्याबरोबर त्यानें हातांतलें काम तसेंच टाकलें आणि संगतीं कांहीं पोरें घेऊन तो बंदराकडे धांवला. तेथें तीं भव्य आणि सुंदर तारवें पाहून त्याला कांहीं विलक्षण आवेश आला: त्याला वाटलें कीं आपणही खलाशी व्हावें. ह्मणून लागलेंच एका होडींत बसून तो निघाला आणि भरधांव करून त्यानें तीं तारवें गाठलीं आणि तिकडचा जो मुख्य सेनापती होता त्याची भेट घेऊन त्याला त्यानें आपली इच्छा कळविली. त्याला याची हुषारी पाहून फार आनंद झाला आणि तारवावर त्यानें त्याला कांहीं कामही नेमून दिलें. तेथें स्वतांच्या उद्योगामुळें दिवसेंदिवस त्याची बढती होत गेली आणि लौकरच त्याला मुख्य सेनापतीची जागा मिळाली. त्यानें पुष्कळ लढाया मारल्या. त्यांत **वेगो** येथें १७७२ त जी लढाई झाली ती प्रसिद्ध आहे. तींत त्यानें **स्प्यानिअर्ड** लोकांचा पराभव केला. इतकी त्याची बढती झाली परंतु तो आपला पूर्वीचा गांव आणि धंदा विसरला नाहीं. पुनः कांहीं कारणामुळें तो एकवेळ या गांवीं आला. आतां त्याची योग्यता मोठी आणि त्या सर्व सैन्याचा तो अधिपती. परंतु इकडे येण्याबरोबर अगोदर त्यानें आपल्या जुन्या धन्याची भेट घेतली आणि त्याच्या घरीं दोन दिवस राहून तेथें जी कांहीं भाजी भाकर मिळाली तिला मान देऊन मग तो पुढें चालता झाला. याहूनही **आंड्र्यू जॉन्सन्**चा पराक्रम कांहीं विशेष. तोही पण जातीचा दर्जीच. **अमेरिकेंत युनाइटेड् स्टेट्स** ह्मणून प्रजासत्ताक स्वतंत्र राज्य आहे. तेथील हा कांहीं वर्षांपूर्वी **प्रेसिडेंट** ह्मणजे अध्यक्ष असे. तो फार चतुर असून त्याचा स्वभाव फार शांत होता. आणि त्याचा स्वतांचा व्यवहार फार चोख असल्यामुळें कोणत्याही कामांत लबाडी ह्मणून त्याला अगदीं आवडत नसे. **वाशिंग्टन** हें तिकडचें राजधानीचें शहर. तेथें त्यानें एक वेळ भाषण केलें आणि त्यांत त्यानें आपल्या आयुष्याची एकंदर हकीगत सांगितली. तो ह्मणाला कीं मीं एका लहानशा हुद्यावरून एवढ्या मोठ्या योग्यतेस चढलों आहे, आणि मीं सर्व कांहीं कामें केलीं आहेत. हें ऐकून जमलेल्या कांहीं कुटाळ लोकांतून 'दर्जी, दर्जी' असा ध्वनी निघाला. परंतु या भाषणाचा त्याला फारसा राग आला नाहीं आणि त्यानें त्या वेळेस त्यांला उत्तरही फार समर्पक दिलें. ता ह्मणाला "मी दर्जी तर खराच. तुह्मी मला दर्जी ह्मटलेंत ह्मणून त्याचा मला राग नाहीं. परंतु तें केवळ मला एक भूषण आहे असें मीं समजतों. तशांत मीं जेव्हां दर्ज्याचें काम करीत असें तेव्हां ह्मणजे मला गिऱ्हाईक कमी होतें असेंही नाहीं. मीं कधीं कोणाचें कापड चोरलें नाहीं आणि माझ्या कामांत मला कोणीं नांवही ठेवलें नाहीं. माझे कपडे सर्वांस पसंत पडत आणि ते मीं वेळच्यावेळेस तयार करून देत असे."

**कार्डिनल वूलसी, डीफो**, आणि **एकेन्साइड्** हीं सर्व पहिल्यानें खाटक्यांचीं पोरें, परंतु नुसत्या उद्योगाच्या बळावर हे पुढें नांवालौकिकास आले. **वूलसी**ची गोष्ट तर पुष्कळांस माहित आहे. तो मूळचा अगदीं गरीब असल्यामुळें श्रीमंत लोकांच्या मुलांस घरीं घटका दोन घटका शिकवून आपला

चरितार्थ चालवीत असे. परंतु लौकरच द्विवशीं या बेटाजव- हुषारी हीं लोकांच्या नजरेस येऊन त्याला एकानंतर एक अशा बढतीच्या जागा मिळत गेल्या, आणि शेवटीं **यॉर्क** एथील मुख्य धर्माध्यक्षाच्या जागेवर त्याची नेमणूक झाली. त्या जागेचा पगार मोठा असून तिकडचा अधिका- रही विशेष आहे. यामुळें लौकरच तो मोठा श्रीमान् झाला. **ऑक्सफोर्ड** एथील युनिव्हर्सिटीस द्रव्यद्वारा त्यानें पुष्कळ मदत केली. **क्राइस्टचर्च** ह्मणून जी मोठी पाठशाळा आहे तिची स्थापनाही त्यानेंच केली आणि एक मोठी सुंदर इमा- रत बांधून त्यानें ती आपल्या राजास नजर केली. यामुळें त्यावेळचा राजा **आठवा हेन्री** याची त्याजवर पूर्ण मेहेर झाली आणि त्यानें त्याला **लार्ड चान्सेलर** ह्मणजे मुख्य- प्रधानाची जागा दिली. **डीफो** हा लहानपणीं लोकरीच्या टोप्या वगैरे करून विकीत असे. परंतु कांहीं कारणामुळें त्याचा तो धंदा बरोबर चालला नाहीं, यामुळें त्यानें तो सोडला आणि कोणत्याशा एका आफिसांत कारकुनीची एक लहानशी जागा त्यानें धरली. तेथें देखील त्याचें कांहीं जमलें नाहीं. दैववशात् ती जागाच कमी झाली. यामुळें तो अतिशय त्रासला आणि कांहीं तरी स्वतंत्र धंदा करावा असा त्यानें निश्चय केला. कांहीं लहान लहान पुस्तकें छापविलीं आणि त्यांत त्याला थोडेसे पैसे मिळाले. तेव्हां तोच धंदा त्यानें पुढें चालविला. हल्लीं त्याचे पुष्कळ ग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्यांत '**रॉबिन्सन् क्रुसो**' या नांवाची अ कल्पित गोष्ट त्यानें लिहिली ती पुष्कळ लोकांच्या पाहण्यां आहे. शाळांतील लहान मुलांस वाचण्याकरतां ती बहुत व रून देत असतात. **एकेन्साइड** यानें केलेले कविताबद्ध ग्रं



पण जातीचा दर्जीच.

मजास[illegible] वैद्यकीच्या कामांतही तो निपुण होता, आणि त्या संबंधानें देखील त्याचे बरेच ग्रंथ आहेत. **कर्क- व्हाइट** हा लहानपणीं एका पायमोजेवाल्याच्या दुकानांत चाकरीस असे. परंतु तेव्हांपासून त्याला अभ्यासाचा फार नाद यामुळें त्यानें ती चाकरी सोडली आणि तो एका वकी- लाच्या आफिसांत जाऊन राहिला. तेथें आपलें काम संभाळून त्यानें **लाटिन** आणि **ग्रीक** या भाषांचा अभ्यास केला. ही त्याची हुषारी पाहून एका दयाळू व उदार गृह- स्थानें त्याला शाळेंत पाठविण्याची तजवीज केली आणि त्याच्या जेवणाखाण्याचा वगैरे सर्व खर्च तोच देऊं लागला. याप्रमाणें त्यानें विद्या संपादन केली. त्यानें केलेल्या कविता हल्लीं प्रसिद्ध आहेत. **बनिअन** हा एका तांबटाचा मुलगा. याचेही ग्रंथ बरेच आहेत. त्यांत '**पिलग्रिम्स प्रोग्रेस**' ह्मणजे 'एका यात्रेकऱ्याचा प्रवास' या नांवाचें एक उ- त्कृष्ट रूपक आहे. यांतील बहुतेक नावें **ख्रिस्ती** धर्मांतून घेतलीं आहेत तरी एकंदरींत हें पुस्तक प्रत्येक धर्मांतील मनुष्यांनीं वाचण्याजोगें आहे. हें उपदेशपर असून याची भाषा शुद्ध सरळ व फार रसाळ आहे. **जोसेफ लांका- स्टर** हा एका बुरुडाचा मुलगा. यानें आपली विद्या संपा- दन करण्याकरतां पुष्कळ श्रम केले आणि नंतर आपल्या सारखे जे गरीब कुळांत जन्मलेले अशांना विद्या शिकवि- ण्याच्या कामांत त्यानें आपलें बहुतेक आयुष्य घालविलें. लहान लहान पुस्तकें छापवून त्यानें तीं गरीब लोकांस फुकट वांटावीं आणि प्रसिद्ध ठिकाणीं ऊभें राहून त्यांच्या- करतां उपयुक्त विषयावर त्यानें व्याख्यानें द्यावीं. हा मोठा धार्मिक असे. वाफेचें यंत्र तयार करण्याच्या कामांत ति-

यांचीं नांवें प्रसिद्ध आहेत—**न्यूकमन, वाट्ट,** आणि **स्टीफन्सन्**. न्यूकमन आणि वाट्ट हे मूळचे सोनार. त्यांत वाट्ट हा इंजिनीअर लोकांस उपयोगी पडणारीं कांहीं लहान लहान हत्यारें तयार करून विकीत असे. स्टीफन्सन् हा कोळशांच्या खाणींत काम करीत असे. तिकडे त्याला रोजी दीड आणा मिळावा. **हंटिंग्डन** या नांवाचा एक मोठा धार्मिक मनुष्य होऊन गेला. त्यानें धर्मसंबंधीं पुष्कळ ग्रंथ लिहिले आहेत. परंतु हा एका यःकश्चित् शेतकऱ्याचा मुलगा. यानें स्वतां कांहीं दिवस हेलपाटी केली आहे आणि हा चांगला मोठा बाप्या होई तोंपर्यंत अगदीं अक्षरशत्रु होता. लांकडावर कोरून चित्रें छापविण्याची विद्या **बेविक** यानें शोधून काढली. परंतु तत्पूर्वी कांहीं दिवस तो कोळशांच्या खाणींत खपत असे. **डॉड्स्ली** याचें पुस्तकें विकण्याचें मोठें दुकान होतें आणि त्यानें स्वतां लिहिलेले ग्रंथही बरेच आहेत. परंतु तो व **हॉल्क्रॉफ्ट** हे दोघे घोडेवाल्याचें काम करीत असत. यामुळें धन्याच्या गाडीपुढें यांना कांहीं दिवस धांवावें लागे. **ब्याफिन्** या नांवाचा एक नावाडी होऊन गेला. त्यानें उत्तरमहासागरांत फिरून पुष्कळ शोध लावले आहेत. ब्याफिन्चें आखात ह्मणतात तें याच्याच नांवावरून. परंतु तारवावर पहिल्यानें यानें अगदीं कनिष्ठ प्रकारची चाकरी केली आहे. **सर क्लौड्स्लेशॉवेल** याची गोष्ट मागें सांगितलीच आहे. तोही पण तारवावरच लहानाचा मोठा झाला.

ज्योतिषशास्त्रवेत्ता **हर्शल** याची गोष्ट तर फारच चमत्कारिक आहे. हा मूळ जर्मनी मध्यें राहणारा. परंतु त्यानें आपलें बहुतेक आयुष्य इंग्लंडांतच घालविलें. चौदा वर्षांचा झाला तेव्हां त्याच्या बापानें त्याला पलटणींत चाकरी ला-



वून दिली. तिकडे तो तुतारीवाल्याचें काम करीत असे. त्यावेळेस ऑस्ट्रिआ, जर्मनी, आणि फ्रान्स यांच्यामध्यें लढाई चालू होती. ती सतत सात वर्षें चालली ह्मणून इंग्रजींत तिला ‘ सेवन यिअर्स वार ’ असें ह्मणतात. हर्शल हा पलटणीबरोबर फ्रान्स मध्यें गेला, आणि तिकडे त्याची व कांहीं इंग्रज लोकांची गांठ पडली. त्यांच्या बरोबर तो इंग्लंडांत गेला आणि त्यानें पुढें तेथेंच राहण्याचा निश्चय केला. इंग्लंडांतही त्याला पूर्वीप्रमाणेंच पलटणीच्या बाजेवाल्यांमध्यें चाकरी मिळाली. त्याच्या बापाचाही तोच धंदा असल्यामुळें हें काम तो फार उत्तम रीतीनें जाणत असे. यामुळें त्याची तेथें प्रसिद्धि होऊन वाद्य शिकविण्याच्या कामांत पुष्कळ ठिकाणीं त्याची नेमणूक झाली. याप्रमाणें हा धंदा चालवून फुरसतीचा वेळ तो गणित व ज्योतिष शास्त्रांचा अभ्यास करण्यांत घालवीत असे. ज्योतिष शास्त्रांत तर त्याची इतकी कांहीं गति झाली कीं त्यानें स्वतां एक दुर्बीण तयार केली आणि तिच्या सहायानें सर्व आकाशमंडळ त्यानें शोधून पाहिलें. त्यांत पूर्वी माहीत नव्हता असा एक ग्रह त्याच्या पाहण्यांत आला. त्यास त्यानें त्या वेळचा राजा तिसरा जॉर्ज याच्या सन्मानार्थ जिऑर्जिअम सैडस हें नांव दिलें. या त्याच्या नवीन शोधाबद्दल ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटींतून त्याला एल्. एल्. डी. ही पदवी मिळाली. राहण्याकरतां राजानें त्याला एक मोठें टोलेजंग घर बांधून दिलें आणि कांहीं वर्षासनही चालू केलें. पुढें त्यानें लहान मोठे पांच हजार नवीन तारे शोधून काढले आणि त्याजबद्दल शेवटीं त्याला ‘ नाइट ’ हा किताब मिळाला. त्याच्या संगतीनें त्याची बहीण **लुक्रीशिआ** इलाही

ज्योतिषशास्त्राचें बरेंच ज्ञान झालें आणि पुढें तिनें त्याला पुष्कळ मदत केली. यामुळें तिचीही हल्लीं मोठमोठ्या विद्वानांत गणना होत असते. **चॉट्री, एटी आणि सर टॉमस लॉरेन्स** यांची चित्रविद्येंत फार प्रसिद्धि आहे. मुंबईचे माजी गवर्नर मालकम साहेब यांचा जो टौनहॉलांत पुतळा आहे तो सर टॉमस यानें तयार केला. याच्या हातचे मद्रास व कलकत्ता एथें दुसरे आणखीं पुष्कळ पुतळे आहेत. याचा बाप दारूचा एक लहानसा पिठा ठेवून आपला चरितार्थ चालवीत असे. **मायकेल फाराडे** हा एका सोनाराचा मुलगा. लहानपणीं हा एका जिनगराच्या दुकानांत बुकें बांधण्याचें काम करीत असे. बावीस वर्षांचा होई तोंपर्यंत यानें हाच धंदा चालविला. परंतु हल्लीं याची मोठमोठ्या विद्वान पंडितांत गणना होत असते. **सर हंफ्रे डेवी** ह्मणून जो प्रसिद्ध पदार्थविज्ञानशास्त्री होऊन गेला, त्याच्यावळ यानें कांहीं दिवस अभ्यास केला. परंतु गुरूपेक्षां याचे शोध कांहीं विशेष आहेत. गुरूच्या हातून ज्या गोष्टींचा बरोबर निकाल झाला नाहीं त्यांचा देखील यानें अगदीं स्पष्ट खुलासा करून टाकला आहे.

विस्तीर्ण व सुंदर अशा आकाशमंडळाचें ज्ञान करून देणारें जें ज्योतिषशास्त्र त्याची परिपूर्णता करण्यास पुष्कळ लोकांची मदत लागली आहे. **कोपर्निकस** याचा बाप पोलंड देशांत राहणारा असून तिकडे तो पावबिस्कुटें तयार करून विकीत असे. परंतु मुलानें ज्योतिषशास्त्रसंबंधी अनेक शोध लावले आहेत. सूर्यमंडळाविषयीं लोकांचा पूर्वी असा समज असे कीं, पृथ्वी मध्यभागीं असून सूर्य, चंद्र वगैरे सर्व कांहीं तिच्या सभोंवतीं फिरत आहे. परंतु युरोपखंडांत



पहिल्यानें यानें असा सिद्धांत काढला कीं, सूर्य मध्यभागीं असून पृथ्वी, चंद्र वगैरे ग्रह आणि उपग्रह हे त्याच्या सभोंवतीं फिरत आहेत. हें ह्मणणें सयुक्तिक असून हल्लीं सर्वमान्य झालें आहे. **आर्यभट्ट** वगैरे प्राचीन हिंदू ज्योतिष्यांचेंही असेंच ह्मणणें होतें. यावेळेस युरोपखंडांत पोपाचें प्राधान्य असून बायबलाच्या मताविरुद्ध कांहीं नवीन विचार प्रसिद्ध करणें ह्मणजे फार जोखमाचें काम असे. यामुळें मरेतोंपर्यंत त्यानें आपला ग्रंथ प्रसिद्ध केला नाहीं. आणखी चार घटकांनीं मरणार तों अगोदर कांहीं मित्रांनीं त्याचा तो ग्रंथ छापवून त्यास दाखविला. तो पाहून त्याला फार आनंद झाला आणि नंतर त्यानें आपला प्राण सोडला. या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत त्यानें पोपाचें अज्ञान आणि जुलूम हीं उघड करून दाखविलीं आहेत. **केप्लर** ह्मणजे ज्यानें ग्रहांच्या व उपग्रहांच्या गतींसंबंधी कांहीं नियम शोधून काढले आहेत, हा जर्मनींतील दारू विकणाऱ्या एका पिठेवाल्याचा मुलगा. हा स्वतां पिठ्यांत येणाऱ्या लोकांस ग्लासें वगैरे कांहीं दिवस धुवून देत असे. **डालेंबर्ट** हा फ्रान्स देशांत राहणारा. याचे आईबाप कोण याचा पत्ता नाहीं. पारिस शहरांत **सेंट जीन ला रॉंड** या नांवाचें एक देऊळ आहे. त्याच्या पायऱ्यांवर रात्रीच्या वेळेस याला कोणीसें आणून टाकलें होतें. तेथें दुसऱ्या दिवशीं सकाळीं एका शेजारीण बाईनें त्याला पाहिलें आणि तिला त्याची दया येऊन आपल्या मुलांबरोबर तिनें त्याला वाढविलें. या बाईचा नवरा खिडक्यांचीं तावदानें वगैरे बसवून आपला चरितार्थ चालवीत असे. परंतु डालेंबर्ट हा पुढें मोठा विद्वान पंडित झाला. गणितशास्त्रसंबंधी याचे अनेक ग्रंथ

आहेत. **न्यूटन** हा एका लहानशा सुखवस्तू जमीनदाराचा मुलगा. हा लहान होता तेव्हांच याचा बाप वारला. यामुळें याचा सर्वप्रकारें सांभाळ करणें आईवर पडलें. तरी पुढें त्याची योग्यता किती वाढली हें पुष्कळांस माहित आहे. याचे गणित, ज्योतिष, व दर्शनानुशासन शास्त्रांच्या संबंधाचे पुष्कळ ग्रंथ प्रसिद्ध आहेत. पदार्थांत आकर्षण ह्मणून जो धर्म आहे तो यानें शोधून काढला. झाडावरून फळ खालीं कां पडलें याचा विचार करण्यापेक्षां त्याची गोडी कशी आहे याचाच पुष्कळांस विचार सुचायाचा. परंतु याची बुद्धि आणि याचा उद्योग हीं चमत्कारिक असल्यामुळें अशा क्षुल्लक गोष्टीपासून देखील हा पदार्थांतील आकर्षण धर्म यानें शोधून काढला. **लाप्लेस** ह्मणून फ्रान्स देशांत एक प्रसिद्ध गणिती झाला. त्याची योग्यताही अशीच. परंतु तो एका शेतकऱ्याचा मुलगा. असो, हे सर्व लहानपणीं अगदीं गरीब व निराश्रित होते तरी त्यांचा उद्योग मोठा यामुळें त्यांची योग्यता वाढली आणि ते श्रीमान् झाले, आणि एकंदरींत आपल्या देशाचे व देशबांधवांचे हितकर्ते झाले. हें त्यांचें वैभव जगांतील सर्व संपत्ति देऊनही मिळालें नसतें. किंबहुना असेंही ह्मणतां येईल कीं त्यांची तशी गरीब स्थिति होती ह्मणूनच त्यांस तो तसा उद्योग सुचला आणि त्या उद्योगाचें त्यांस फळही मिळालें. जर ते धनिक असते तर त्यांचें तें धनच कदाचित् त्यांच्या उद्योगाच्या आड येतें आणि त्यांचा बुद्धिप्रभाव लोकांच्या नजरेस न पडता. **लाग्रेंज** ह्मणून एक पंडित होऊन गेला. त्याची गणितशास्त्रांत बरीच गति चालत असे. त्याचा बाप ट्यूरिन एथें अष्ट प्रधानांपैकीं एक प्रधान असून त्याची



संपत्तिही पुष्कळ होती. परंतु पुढें त्यानें कांहीं व्यापार सुरू केला आणि त्यांत असलेली त्याची सर्व संपत्ती नाहींशी झाली. यामुळें तो अगदीं दरिद्री झाला आणि घरचा सर्व संसार लाग्रेंज याच्याच शिरावर पडला. लाग्रेंज हा मोठा चाणाक्ष होता आणि त्यानें श्रमही पुष्कळ केले यामुळें लौकरच तो मोठ्या योग्यतेस चढला. त्यानें एका ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं जर माझा बाप पूर्वीप्रमाणेंच श्रीमान् असता तर खचित मी एवढ्या योग्यतेस चढलों नसतों.

पाद्री लोक ज्यांनां बायबलाशिवाय दुसरें कांहीं फारसें माहित नसतें, हे ह्मणजे घरचे मोठे श्रीमान् असतात असें नाहीं. परंतु इंग्लंड देशाचा इतिहास वाचल्यास आपल्यास असें दिसून येतें कीं अशांचीं मुलें देखील मोठमोठ्या पदवीस चढलीं आहेत. **ड्रेक** व **नेलसन** यांनीं जहाजावरून मोठमोठ्या लढाया मारल्या आणि आपल्या देशाचें वर्चस्व स्थापित केलें. नेलसन सारखे दुसरे शूर सरदार तर फारच थोडे सांपडतील. **नेपालिअन**ची देखील त्यानें त्रेधा त्रेधा करून सोडली. या त्याच्या पराक्रमाबद्दल त्याला लॉर्ड ही पदवी मिळाली आणि ती हल्लीं त्याच्या घराण्यांत चालू आहे. **वोल्यास्टन** यानें रसायन शास्त्रांत पुष्कळ शोध लावले. पालाडिअम व ऱ्होडिअम या धातु यानें शोधून काढल्या; आणि प्लाटिनमचे धर्म काय आहेत हें यानें स्पष्ट केलें. **यंग** या नांवाचा एक डॉक्टर होऊन गेला. त्याचे वैद्यकीच्या कामांत उपयोगीं पडणारे पुष्कळ ग्रंथ आहेत. **प्लेफेअर** या नांवाचा एक गणिती झाला. त्यानें आल्प्स पाहडांत फिरून भूगर्भशास्त्राच्या संबंधानें पुष्कळ शोध लावले आहेत. **बेल** याचे शरीररचना व इंद्रियविज्ञानशास्त्रां-

संबंधी ग्रंथ प्रसिद्ध आहेत. **रेन, रेनाल्ड्स** आणि **वुइल्की** यांची चित्रविद्येंत प्रसिद्धि आहे. **थर्लो** व **क्यांबेल** हे कायद्यांत वाकब होऊन गेले. **आडिसन, जॉन्सन, गोल्ड्स्मिथ, कोलेरिज**, आणि **टेनिसन** यांचे गद्यपद्यात्मक ग्रंथ पुष्कळांच्या पाहण्यांत आहेत. **लॉर्ड हार्डिंग** हे इसवी सन १८४० त हिंदुस्थानचे गवर्नर जनरल होते. यांनीं युरोपांत व हिंदुस्थानांत पुष्कळ लढाया मारल्या. **कर्नल एड्वर्ड्स** आणि **मेजर हॉड्सन** यांची हिंदुस्थानांतील लढायांत बरीच प्रसिद्धि आहे. परंतु हीं सर्व पाहिलीं असतां क्षुद्र भिक्षुकांचीं पोरें. हेचसे काय, परंतु **क्लाइव** आणि **वारन हेस्टिंग्स** हे सुद्धां ह्मणजे, ज्यांनीं हिंदुस्थानचें बहुतेक राज्य काबीज केलें, हे तरी घरचे मोठे श्रीमंत होते असें नाहीं. यांनीं शाळेंत किंवा कॉलेजांत जाऊन अभ्यास केला नाहीं आणि तसें करण्यास त्यांना सामर्थ्यही नव्हतें. यांना जें कांहीं शिक्षण मिळालें तें सर्व व्यापाऱ्यांच्या पेढीवर, वखारींत, किंवा तारवांवर. तिकडेच त्यांनीं उद्योग केला आणि तो उद्योगच त्यांच्या स्वतांच्या व देशाच्या उपयोगीं पडला.

**एड्मंड बर्क** याचे ग्रंथ पुष्कळ आहेत. हा मोठा वक्ता असून राजदरबारांत यास फार मान असे. वारन हेस्टिंग्स याच्या हिंदुस्थानांतील एकंदर कारकीर्दीविरुद्ध यानें पार्लमेंट सभेंत जें भाषण केलें त्याचे मोठमोठाले दोन ग्रंथ आहेत. **स्मीटन** ह्मणून एक प्रसिद्ध इंजिनीअर होऊन गेला. त्याच्या हातच्या मोठमोठ्या अनेक इमारती आहेत. पाण्याच्या आणि हवेच्या जोरानें गिरण्या वगैरे चालविण्याच्या कामांत यानें पुष्कळ सुधारणा केली. **वॉल्टर स्कॉट** याच्या कल्पित कादंबऱ्या व कविताग्रंथ पुष्कळांच्या पाहण्यांत आहेत.



त्याला एकंदर दहा लाखांहून ज्यास्त कर्ज होतें, तें सर्व त्यानें या कादंबऱ्या वगैरे लिहून अल्प काळांत फेडून टाकलें. त्याची विद्वत्ता फार यामुळें त्याला बारोनेटची पदवी मिळाली. **वर्डस्वर्थ** कवीचे ग्रंथही तसेच. त्याची कल्पनाशक्ति इतकी कांहीं विलक्षण कीं अद्यापि त्याचे ग्रंथ कांहीं कांहीं ठिकाणीं मोठमोठ्या विद्वानांस देखील उकलत नाहींत. कांहीं वर्षांपूर्वी एथील कॉलेजांत वर्डस्वर्थ साहेब ह्मणून जे होते त्यांचे हे पितामह. यांचें वळणही कांहीं अंशीं अजोबांच्याच धर्तीवर आहे. यांची विद्वत्ताही सर्व लोक कबूल करतात. **समर्स, हार्डविक** आणि **डनिंग** हे आपल्या विद्वत्तेच्या बळावर लॉर्डच्या पदवीस पोंचले. हीं सर्व वकीलांचीं मुलें. **सरवुइलिअम ब्ल्याकस्टन** हा एका रेशीमविक्याचा मुलगा.. बाप मेला तेव्हां याची आई गरोदर होती. याला कोणाची मदत नव्हती तरी स्वतांच्या उद्योगानेंच हा मुख्य न्यायाधिशाच्या ह्मणजे चीफ जस्टिसच्या योग्यतेस पोंचला. कायद्याच्या संबंधानें **कामेंटरीस** ह्मणून याचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. अशा प्रकारचे हल्लीं दुसरे पुष्कळ ग्रंथ झाले आहेत, परंतु ते सर्व या ग्रंथांच्या आधारानें लिहिले आहेत. **लॉर्ड गिफोर्ड** याचा बाप रस्त्यांत चहा काफी विकून आपला निर्वाह करीत असे. **लॉर्ड डेन्मन** याचा बाप वैद्यकीचा धंदा करीत असे. आणि **जज्ज टयालफोर्ड** याचा बाप तर कलालाच्या दुकानावर दारू तयार करीत असे. **लॉर्ड चीफ ब्यारन पॉलॉक** याची आणि आपल्या हायकोर्टांतील चीफ जस्टिसची योग्यता पाहिली असतां एक, परंतु त्याचा बाप जिनगराचा ह्मणजे खोगिरें विकण्याचा धंदा करीत असे. **लायार्ड** आणि **ऑर्मस्ट्रॉंग** हे पहिल्यानें वकीलाच्या आफिसांत कारकुनी

करीत होते. परंतु पुढें यांनीं मोठमोठे शोध लावले आहेत. नीनीवे ह्मणून एशियामैनर एथें एक ओसाड शहर आहे. तेथें जे कांहीं जुने लेख मिळाले आहेत ते लायार्ड यानें शोधून काढले. कालव्यांतून निरनिराळ्या ठिकाणीं पाणी पोंचविण्याच्या कामांत आर्मस्ट्रॉंग यानें पुष्कळ सुधारणा केली आणि आर्मस्ट्रॉंग आर्डनन्स (तोफखाना) ह्मणतात तो याच्याच नांवावरून.

प्रसिद्ध कवि **मिल्टन** याचा बाप व्याजबट्टा करून आपला चरितार्थ चालवीत असे. **पोप** व **सौदी** यांचेही कविताग्रंथ पुष्कळ असून यांचीही पण मिल्टनप्रमाणेंच विद्वान कवींत गणना होत असते; परंतु यांचे वडील बाजारांत कापडाचें दुकान मांडून बसले होते. **प्रोफेसर वुइल्सन** याची एडिनबर्ग युनिवर्सिटींत तर्क व न्यायशास्त्र शिकविण्याकरतां नेमणूक झाली होती, परंतु त्याच्या बापानें **पेली** येथें एक लहानसा गाडीचा करखाना घातला होता. **लॉर्ड मेकॉले** याची विद्वत्ता तर जगजाहीर आहे. यानें निरनिराळ्या विषयांवर लिहिलेले निबंध व इतिहासग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्यांची भाषा शुद्ध व मार्मिक असून फार रसाळ आहे. हिंदुस्थानांतील लोकांच्या रीतीभाती व इकडचा राज्य चालविण्याचा एकंदर क्रम वगैरे स्वतां डोळ्यांनीं पाहून त्यांजविषयीं आपले विचार कांहीं निबंधांत यानें प्रसिद्ध केले आहेत ते मोठे वाचण्यालायख आहेत. यानें पार्लमेंट सभेंत पुष्कळ वर्षें काम केलें आणि यामुळें शेवटीं याला लॉर्ड ही पदवी मिळाली. याचा बाप आफ्रिकेंतील शिद्दी लोकांबरोबर कांहीं किराण्याचा व्यापार करीत असे. **कीट्स** ह्मणून एक कवि होऊन गेला. तो कांहीं दिवस गांध्याचें दुकान मांडून



बसला होता. सर **हंफ्रे डेवी** हा एका वैद्याजवळ कॉंपौंडरचें ह्मणजे औषधें वगैरे कुटण्याचें काम करीत असे. परंतु पुढें याची योग्यता किती वाढली हें पुष्कळांस माहित आहे. रसायनशास्त्राच्या आधारानें यानें पुष्कळ नवीन नवीन शोध लावले आहेत. तसेंच विजेच्या संबंधानेंही याचे पुष्कळ ग्रंथ आहेत. **सेफ्टी ल्यांप** ह्मणून एका प्रकारचा दिवा आहे. त्याचा कोळशांच्या खाणींत फार उपयोग होत असतो. तो पहिल्यानें यानें शोधून काढला आणि हल्लीं तो याच्याच नांवानें प्रसिद्ध आहे. त्यापासून खाणींत आग लागून मोठमोठाले अनर्थ होण्याची भीति नसते. यानें एका ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं ‘जी कांहीं मीं आज थोडी बहुत विद्या संपादन केली आणि दोन पैसे मिळविले ते सर्व माझे मीं. मला कोणाची मदत नव्हती आणि कोणाच्या मदतीची मीं फारशी जरूरही ठेवली नाहीं.’ हें त्याचें बोलणें ह्मणजे गर्वोक्तीचें होतें असें नाहीं. असलेली आपली एक खरी गोष्ट त्यानें सांगीतली एवढेंच, नहून त्याला आपल्या विद्येचा किंवा पैशाचा अभिमान होता अशांतला मुळींच प्रकार नाहीं. **रिचर्ड ओवेन** याची आणि **न्यूटन**ची योग्यता एक. एवढेंच कीं न्यूटनचा विषय पडला गणितशास्त्राचा आणि याचे शोध ह्मटले ह्मणजे सर्व सृष्टपदार्थविज्ञानशास्त्रसंबंधी. या विषयाच्या संबंधानें त्याची जरी एवढी प्रसिद्धि झाली तरी तो चांगला मोठा बाप्या होई तोंपर्यंत त्याची त्याला अगदीं बिलकुल माहिती नव्हती. लहानपणापासून तारवावरच याला कांहींशी चाकरी होती आणि तेथेंच त्यानें आपलें अर्धें अधिक आयुष्य घालविलें. नंतर त्याला, **हंटर** ह्मणून एक विद्वान डॉक्टर होऊन गेला

त्याच्या म्यूझिअम ह्मणजे पदार्थसंग्रहालयांत चाकरी मिळाली. तेथें असलेल्या पदार्थांची त्यांच्या त्यांच्या जातींप्रमाणें यादी करण्याचें काम याजकडेस सोंपलें होतें. हें काम त्याच्याजवळ पुष्कळ वर्षेपर्यंत चाललें, आणि तें त्यानें इतकें कांहीं लक्ष लावून केलें कीं तेथें असलेल्या सर्व पदार्थांची शास्त्ररीत्या त्याला बरीच माहिती झाली. अशा रीतीनें त्याला हें जें थोडेंसें ज्ञान प्राप्त झालें त्यावर त्यानें आपल्या पुढील विद्वत्तेचा पाया घातला आणि तो इतका कांहीं बळकट झाला कीं या विषयाच्या संबंधानें लौकरच त्याची प्रसिद्धी होऊन मोठमोठ्या विद्वानांत त्याची गणना होऊं लागली.

एथवर सांगितल्या त्या बहुतेक इंग्रज लोकांच्या गोष्टी झाल्या. या शिवाय **फ्रेंच, इटालिअन, जर्मन** यांच्यामध्येंही पुष्कळ असे लोक होऊन गेले कीं पाहिलें असतां घरचे ते अगदीं गरीब परंतु केवळ बुद्धीच्या आणि उद्योगाच्या जोरावर ते मोठमोठ्या योग्यतेस चढले. **क्लॉड** हा एका स्वयंपाक्याचा मुलगा, परंतु चित्रविद्येंत तो इतका कांहीं निपुण झाला कीं त्याच्या हातच्या चित्रांस अद्याप फार मान आहे. **गीपस** याचीही गोष्ट अशीच परंतु त्याचा बाप पावबिस्कुटें विकीत असे. **लिओपोल्ड रॉबर्ट** याचा बाप घड्याळें नीट करीत असे. **हेडन** याची गायनकलेंत फार प्रसिद्धि, परंतु याचा बाप गाडी हांकीत असे. **डागेरी** हा नाटकशाळेंत पडदे व सोंगें वगैरे रंगवीत असे, परंतु तेथेंच रसायनशास्त्राच्या मदतीनें त्यानें पुष्कळ नवीन नवीन रंग शोधून काढले आणि ते हल्लीं त्याच्या नांवानें प्रसिद्ध आहेत. **रोम** एथें सातवा **ग्रेगरी** ह्मणून एक पोप



होऊन गेला. त्याची सत्ता एवढी कीं जर्मनीच्या बादशाहास देखील त्यानें एक वेळ पदच्युत केलें. परंतु हा एका सुताराचा मुलगा. तसेंच पांचवा **सेक्स्टस** ह्मणून दुसरा एक पोप होऊन गेला, तो एका धनगराचा मुलगा. सहाव्या **एड्रिअन**ची गोष्ट तर पुष्कळांस माहित आहे. हा एका कोळ्याचा मुलगा. लहानपणापासून याला अभ्यासाचा फार नाद, परंतु घरची गरीबी यामुळें शाळेंतले धडे तयार करण्यास रात्रौ याला दिवा देखील मिळत नसे. ह्मणून रस्त्यावर किंवा देवळाच्या बाहेरच्या बाजूस जे दिवे असत त्यांच्या खालीं बसून यानें अभ्यास करावा. या प्रकारचा ज्याच्या मनाचा दृढ निश्चय आणि असे ज्याचे सतत परिश्रम अशा मनुष्याचा उद्योग कसा बरें सफळ होणार नाहीं ? तो लौकरच मोठा विद्वान झाला आणि यामुळें त्याला एकीमागून एक अशा बढतीच्या जागा मिळत गेल्या. आणि शेवटीं जर्मनीचा बादशाहा पांचवा **चार्लस** हा अल्पवयस्क असल्यामुळें राज्याचा सर्व कारभार तोच पाहूं लागला. चार्लस मोठा होऊन गादीवर बसला तेव्हां **एड्रिअन** याला पोपाचा अधिकार मिळाला. **हॉय** या नांवाचा फ्रान्स देशांत एक भूगर्भशास्त्रवेत्ता होऊन गेला. त्याला खनिजपदार्थांची उत्तम प्रकारची माहिती होती. परंतु हा एका कोष्ट्याचा मुलगा. पहिला **नेपोलिअन** यास राज्याधिकार मिळूं नये ह्मणून याचा फार आग्रह असे. तरी नेपोलिअन जेव्हां गादीवर बसला तेव्हां त्यानें याला बोलावून याच्या विद्वत्तेबद्दल याचा फार सत्कार केला. यानें केलेले ग्रंथ तो नेहमीं वाचीत असे. **हॉटफुइल** हा एका पाववाल्याचा मुलगा; परंतु पुढें यंत्रशास्त्रांत हा फार वाकब झाला. लहान

घड्याळांच्या रचनेंत यानें पुष्कळ सुधारणा केली. **जोसेफ फुरिअर** हा जातीचा दर्जी, परंतु गणितशास्त्रांत हा मोठा प्रवीण झाला. **ड्यूरंड** हा एका चांभाराचा मुलगा, परंतु हल्लीं त्याच्या हातच्या मोठमोठ्या इमारती आहेत. **गेस्नेर** हा पण जातीचा चांभार, परंतु सृष्टपदार्थविज्ञानशास्त्रावर यानें मोठमोठाले ग्रंथ लिहिले आहेत. एक तर घरचा हा अगदीं गरीब; तशांत याची प्रकृति फार अशक्त, आणि याचे आईबाप लहानपणींच वारले, यामुळें याला पुष्कळ हाल सोसावे लागले. तरी निराश न होतां यानें आपला अभ्यास सतत चालू ठेवला. त्यांत कांहीं कमताई केली नाहीं. यामुळें तो एवढ्या मोठ्या योग्यतेस चढला. याचें उदाहरण पाहून आपली तर पक्की खातरी होते कीं मनुष्यानें जर करावा तसा उद्योग केला तर कोणतीही गोष्ट त्याला साध्य होणार नाहीं असें नाहीं. अशा मनुष्यास किती जरी उद्योग असला तरी अमकें एक काम करण्यास वेळ नाहीं असें कधींही होत नाहीं. **पिअर रेमस** याचीही अशीच चमत्कारिक गोष्ट आहे. ती प्रत्येक मनुष्यानें लक्षांत ठेवण्याजोगी आहे. याचे आईबाप मूळ पिकर्डी एथें राहणार. त्यांची फार गरीब स्थिति असल्यामुळें रस्त्यांत हेलपाटी करून ते मोठ्या कष्टानें आपला निर्वाह करीत असत. त्यावेळेस **रेमस** हा वयानें फार लहान तेव्हां त्याच्या हातून दुसरें तें काय काम होणार? रानांतून लोकांचीं गुरें चारून आणावीं आणि जे कांहीं दोन पैसे मिळतील ते त्यानें बापाच्या स्वाधीन करावे. अशा रीतीनें बरेच दिवस गेले. शेवटीं पोर तर अतिशय त्रासलें आणि यामुळें एके दिवशीं कोणास न सांगतां त्यानें थेट **पारिस** शहरचा रस्ता



धरला, आणि मजल दरमजल करून तिकडे एकदांसा तो जाऊन पोंचला. शहरची वस्ती आणि तेथें हा अनोळखी, तशांत जवळ कांहीं पैसाही नव्हता यामुळें त्याची फार वाताहत झाली. शेवटीं याला भेट, त्याला भेट असें करून **नावारे** कॉलेजांत त्याला हमालाची जागा मिळाली. पोर फार हुषार असल्यामुळें कॉलेजांतील लोकांचा लौकरच त्याजवर थोडथोडा लोभ जडत चालला. तेव्हां त्यानें आपलें काम संभाळून त्यांच्या आश्रयानें कांहीं अभ्यास सुरू केला आणि यामुळें शेवटीं तो इतका मोठा विद्वान पंडित झाला कीं **अॅरिस्टॉटल**च्या मताचेंही त्यानें बऱ्याच ठिकाणीं खंडण केलें आणि हल्लीं त्याचे तर्क व गणित शास्त्रांवर पुष्कळ ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

रसायनशास्त्रवेत्ता **वॉन कोलिन** हा फ्रान्स देशांतील एका शेतकऱ्याचा मुलगा. लहानपणीं हा शाळेंत जात असे तेव्हां याच्या अंगावर कपडे अगदीं घाणेरडे असत, तरी वर्गांतील इतर मुलांपेक्षां याची हुशारी कांहीं विशेष असल्यामुळें, पंतोजीस याची कींव येऊन तो वेळोवेळीं याची फार तारीफ करीत असे. 'शाबास मुला शाबास; कॉलिन, तूं कांहीं चिंता करूं नको. तूं असाच लक्ष लावून अभ्यास कर म्हणजे लौकरच तुझे हे फाटके कपडे जाऊन चांगले नवे येतील.' असे गोडगोड शब्द बोलून तो त्यास शिकण्यास नेहमीं उत्तेजन देत असे. तो शरीरानें चांगला मजबूत होता यामुळें एका डॉक्टरानें त्याला आपल्याजवळ औषधें वगैरे कुटण्याकरतां ठेवण्याचें कबूल केलें. त्यालाही वाटलें कीं शाळेंत जाऊन जर हें काम होत आहे तर त्यापासून आपल्यास पुस्तकांची वगैरे थोडीशी मदत होईल.

अशा बेतानें तो त्याजकडेस जाऊन राहिला. परंतु डॉक्टर जात्या थोडासा लोभी असे आणि तो याला चांगला धट्टा-कट्टा असा पाहून फारच काम सांगूं लागला यामुळें याचा अभ्यास कांहींसा मागें पडत चालला. असें पाहून त्यानें ती चाकरी सोडली आणि कांहीं महिने तेथेंच राहून त्यानें आपला अभ्यास चालविला. नंतर असलेला आपला थोडासा बोजा पाठीवर घेऊन तो **पारिस** शहरास गेला. तेथें एखादी लहानशी चाकरी मिळावी ह्मणून त्यानें पुष्कळ प्रयत्न केले, परंतु चाकरी कांहीं कोठें मिळेना. परदेशांत एकटा, तशांत वय फार लहान, खाण्यापिण्याचे हाल आणि लांबचा पल्ला चालून आलेला यामुळें जात्या त्याचें हाड मजबूत तरी त्याला थोडथोडा ताप येऊं लागला, आणि दिवसेंदिवस त्याची प्रकृति क्षीण होत चालली. हें पाहून आसपासच्या कांहीं लोकांनीं त्याला एका धर्मार्थ दवाखान्यांत नेऊन टाकलें. तेथें तो कांहीं दिवसांनीं मरणार अशी त्याचीही पक्की खातरी झाली. परंतु होणार गोष्ट कोणाला समजत नाहीं असें ह्मणतात तें खोटें नव्हे. दवाखान्यांत औषधपाण्याची तजवीज फार चांगली असल्यामुळें त्या दुखण्यांतून तो लौकरच बरा झाला आणि पुनः पूर्वीप्रमाणें ताजातवाना होऊन चाकरीच्या शोधार्थ इकडे तिकडे फिरूं लागला. त्यानें पूर्वी कांहीं दिवस तें काम केलेंच होतें यामुळें दुसऱ्या एका डॉक्टराजवळ त्याला कॉम्पौंडरची चाकरी मिळाली. तेथें त्याची व प्रसिद्ध डॉक्टर फोरक्रॉय याची ओळख झाली. कॉलिन याची हुषारी पाहून तो डॉक्टर फार खूष झाला आणि त्यानें त्याला आपल्या खासगी कारकुनाची जागा दिली. इकडे तो पुष्कळ वर्षें राहिला



आणि त्या डॉक्टराच्या सहवासानें त्यानें आपली इतकी कांहीं सुधारणा केली कीं कांहीं वर्षांनंतर फोरक्रॉय जेव्हां मेला तेव्हां कालेजांतील रसायनशास्त्राच्या मुख्य गुरूची ह्मणजे प्रोफेसरची जागा रिकामी झाली ती सर्वानुमतें वॉन कोलिन यास मिळाली. पुढें इसवी सन १८२९ त तो मूळ ज्या प्रांतांतला राहणारा तेथच्या लोकांनीं 'चेम्बर आफ् डेपुटीस' ह्मणून फ्रान्स देशांत पार्लमेंट सारखी जी सभा आहे, तींत आपल्या वतीनें त्याला मुखत्यार नेमलें. यामुळें तो पुनः एकवार आपल्या गांवीं ह्मणजे जिकडून कांहीं वर्षांपूर्वी अगदीं गरीब स्थिति असल्यामुळें चाकरीच्या शोधार्थ कोणास नकळत तो निघून गेला होता, तिकडे मोठ्या थाटमाटानें परत आला आणि यावेळेस लोकांनीं त्याचा मोठा सत्कार केला.

लष्करी खात्यांत अशा प्रकारचीं पुष्कळ उदाहरणें पाहण्यांत येतात. तरी एकंदरींत हा प्रकार फ्रान्स देशांत विशेष घडून येतो असें ह्मटलें पाहिजे. तिकडे यःकश्चित् शिपाई जरी असला तरी तो स्वतांच्या हुशारीनें आणि मेहनतीनें लौकरच मोठ्या योग्यतेस चढतो. **हॉश, हम्बर्ट** आणि **पिश्ग्रू** हे पहिल्यानें हडेलहप करणारे अगदीं सामान्य प्रतीचे शिपाई होते. परंतु पुढें यांची योग्यता किती वाढली हें पुष्कळांस माहित आहे. **हॉश** हा जेव्हां पहिल्यानें पलटणींत चाकरीस राहिला तेव्हां कलाबतूचें वगैरे काम करून पगाराशिवाय तो आणखी कांहीं पैसे मिळवी आणि त्यांचीं लष्करी खात्यांत उपयोगी पडणारीं पुस्तकें विकत घेऊन तो तीं फावल्या वेळेस वाचीत असे. यामुळें त्या खात्याची त्याला पुष्कळ माहिती झाली, आणि लौकरच

अशा बेतानें तो त्याजकडेस जाऊन राहिला. परंतु डॉक्टर जात्या थोडासा लोभी असे आणि तो याला चांगला धट्टा-कट्टा असा पाहून फारच काम सांगूं लागला यामुळें याचा अभ्यास कांहींसा मागें पडत चालला. असें पाहून त्यानें ती चाकरी सोडली आणि कांहीं महिने तेथेंच राहून त्यानें आपला अभ्यास चालविला. नंतर असलेला आपला थोडासा बोजा पाठीवर घेऊन तो पारिस शहरास गेला. तेथें एखादी लहानशी चाकरी मिळावी ह्मणून त्यानें पुष्कळ प्रयत्न केले, परंतु चाकरी कांहीं कोठें मिळेना. परदेशांत एकटा, तशांत वय फार लहान, खाण्यापिण्याचे हाल आणि लांबचा पल्ला चालून आलेला यामुळें जात्या त्याचें हाड मजबूत तरी त्याला थोडथोडा ताप येऊं लागला, आणि दिवसेंदिवस त्याची प्रकृति क्षीण होत चालली. हें पाहून आसपासच्या कांहीं लोकांनीं त्याला एका धर्मार्थ दवाखान्यांत नेऊन टाकलें. तेथें तो कांहीं दिवसांनीं मरणार अशी त्याचीही पक्की खातरी झाली. परंतु होणार गोष्ट कोणाला समजत नाहीं असें ह्मणतात तें खोटें नव्हे. दवाखान्यांत औषधपाण्यांची तजवीज फार चांगली असल्यामुळें त्या दुखण्यांतून तो लौकरच बरा झाला आणि पुनः पूर्वीप्रमाणें ताजातवाना होऊन चाकरीच्या शोधार्थ इकडे तिकडे फिरूं लागला. त्यानें पूर्वी कांहीं दिवस तें काम केलेंच होतें यामुळें दुसऱ्या एका डॉक्टराजवळ त्याला कॉम्पौंडरची चाकरी मिळाली. तेथें त्याची व प्रसिद्ध डॉक्टर फोरक्रॉय याची ओळख झाली. कॉलिन याची हुषारी पाहून तो डॉक्टर फार खूष झाला आणि त्यानें त्याला आपल्या खासगी कारकुनाची जागा दिली. इकडे तो पुष्कळ वर्षें राहिला



आणि त्या डॉक्टराच्या सहवासानें त्यानें आपली इतकी कांहीं सुधारणा केली कीं कांहीं वर्षांनंतर फोरक्रॉय जेव्हां मेला तेव्हां कालेजांतील रसायनशास्त्राच्या मुख्य गुरूची ह्मणजे प्रोफेसरची जागा रिकामी झाली ती सर्वानुमतें वॉन कोलिन यास मिळाली. पुढें इसवी सन १८२९ त तो मूळ ज्या प्रांतांतला राहणारा तेथच्या लोकांनीं 'चेम्बर आफ् डेपुटीस' ह्मणून फ्रान्स देशांत पार्लमेंट सारखी जी सभा आहे, तींत आपल्या वतीनें त्याला मुखत्यार नेमलें. यामुळें तो पुनः एकवार आपल्या गांवीं ह्मणजे जिकडून कांहीं वर्षांपूर्वीं अगदीं गरीब स्थिति असल्यामुळें चाकरीच्या शोधार्थ कोणास नकळत तो निघून गेला होता, तिकडे मोठ्या थाटमाटानें परत आला आणि यावेळेस लोकांनीं त्याचा मोठा सत्कार केला.

लष्करी खात्यांत अशा प्रकारचीं पुष्कळ उदाहरणें पाहण्यांत येतात. तरी एकंदरींत हा प्रकार फ्रान्स देशांत विशेष घडून येतो असें ह्मटलें पाहिजे. तिकडे यःकश्चित् शिपाई जरी असला तरी तो स्वतांच्या हुशारीनें आणि मेहनतीनें लौकरच मोठ्या योग्यतेस चढतो. **हॉश, हम्बर्ट** आणि **पिश्ग्रू** हे पहिल्यानें हडेलहप करणारे अगदीं सामान्य प्रतीचे शिपाई होते. परंतु पुढें यांची योग्यता किती वाढली हें पुष्कळांस माहित आहे. **हॉश** हा जेव्हां पहिल्यानें पलटणींत चाकरीस राहिला तेव्हां कलाबतूचें वगैरे काम करून पगाराशिवाय तो आणखी कांहीं पैसे मिळवी आणि त्यांचीं लष्करी खात्यांत उपयोगी पडणारीं पुस्तकें विकत घेऊन तो तीं फावल्या वेळेस वाचीत असे. यामुळें त्या खात्याची त्याला पुष्कळ माहिती झाली, आणि लौकरच

तो प्रसिद्धीस आला. **इंग्लंड** व **ऑस्ट्रिआ** यांजबरोबर **नेपोलिन**च्या ज्या लढाया झाल्या त्यांत त्यानें खूब बहादुरी मिळविली. **हम्बर्ट** हा लहानपणीं अगदीं बेंगरूळ दिसे. तोंडावरची माशी देखील मारण्याची त्याला अकल नव्हती. परंतु सोळा वर्षांचा झाला तेव्हां **न्यान्सी** ह्मणून एक शहर आहे तिकडे तो पळून गेला. तेथें एका दुकानदाराजवळ कांहीं दिवस तो चाकरीस राहिला; नंतर कांहीं दिवस त्यानें हेलपाटी केली आणि मग थोडासा माल खरेदी करून फेरीवाल्याचा धंदा त्यानें पतकरला. कांहीं दिवस गेल्यावर वालंटीअर्स ह्मणजे आपखुषीनें कवाईत शिकणाऱ्या लोकांच्या पलटणींत तो शिरला. तेथें त्याची इतकी कांहीं हुशारी दिसून आली कीं लागलेंच दुसऱ्या वर्षी एका पलटणींत मुख्य सरदाराच्या जागेवर त्याची नेमणूक झाली. याप्रमाणें आणखी दुसऱ्या पुष्कळ सरदारांचीं नांवें प्रसिद्ध आहेत. **क्लेबर, लेफवर, सकेट, विक्टर, मासीना, सेंटसीर, डेलोन, म्यूराट, ऑग्रो, बसीर्स** आणि **नी** यांची लढाईच्या संबंधानें जरी पुष्कळ प्रसिद्धि आहे, तरी पहिल्यानें अगदीं कनिष्ठ प्रकारच्या शिपायांत यांची गणना होत असे. यांपैकीं कांहीं लोक लौकरच प्रसिद्धीस आले, कित्येकांस बराच उशीर लागला, तरी या सर्वांचा उद्योग आणि साहस हीं अगदीं अवर्णनीय आहेत. **सेंट सीर** यांचें नांव वर सांगितलेंच आहे. हा एका चांभाराचा मुलगा. कांहीं दिवस त्याला नाटकाचा नाद लागला होता; त्यांत त्यानें बरेच पैसे मिळविले. नंतर त्यानें एका पलटणींत शिपायाची चाकरी धरली, आणि एका वर्षांत क्यापटनची जागा मिळविली. **विक्टर** यानें कांहीं दिवस पलट-



णींत चाकरी केली परंतु कांहीं कारणामुळें त्याला तिकडून काढून लावलें. तरी खटपट करून पुनः एकवार तो तेथें लागू झाला आणि कांहीं महिने गेले नाहींत तोंच त्याची हुशारी आणि धाडस हीं वरिष्ठांच्या नजरेस येऊन त्याला एकदम **आडज्युटंट** जनरलची जागा मिळाली. **म्यूराट** हा पेरिगोर्ड एथील एका खाणावळीण बाईचा मुलगा; खाणावळींत येणाऱ्या लोकांच्या घोड्यांची दाणापाण्याची हा तजवीज ठेवीत असे. यानें कांहीं दिवस पलटणींत चाकरी केली, परंतु वरिष्ठांचा हुकूम मोडल्याबद्दल त्याला तिकडून काढून लावलें. ह्मणून तो दुसऱ्या एका पलटणींत शिरला आणि तेथें लौकरच स्वतांच्या हुशारीनें तो कर्नलच्या पदवीस पोंचला. **नी** हा अठरा वर्षांचा झाला तेव्हां त्यानें पलटणींत चाकरी धरली. आणि पंचवीस वर्षांचा झाला नाहीं तोंच स्वतांच्या अकलेनें आणि मेहेनतीनें **आडज्युटंट**च्या पायरीस पोंचला. **सौल्ट** यानें सतत सहा वर्षे चाकरी केली, **मेसाना** यानें चौदा वर्षे केली आणि नंतर हे सार्जंट झाले. तरी निराश न होतां यांनीं आपल्या कर्तव्यांत कांहीं कमताई केली नाहीं. यामुळें पुढच्या ज्या कर्नल, जनरल आणि मार्शल आदिकरून पदव्या त्या त्यांस लौकर लौकर मिळत गेल्या. हीं थोडीशीं लांबचीं उदाहरणें झालीं. **शांगार्नेर** आणि **बगोड** हे तर अगदीं अलीकडचे. चार पांच वर्षे चाकरी झाली नाहीं तोंच हे मोठमोठ्या पदवीस चढले. **मार्शल रांडम** हा कांहीं वर्षांपूर्वी फ्रान्स एथें मिनिस्टर आफ वारचें काम पाहत असे. ह्मणजे तेथील अष्टप्रधानांत याची गणना होत असून लढाईसंबंधी जी कांहीं व्यवस्था करणें ती सर्व

याच्या हातून होत असे. परंतु पहिल्यानें हा जेव्हां चाक रीस राहिला तेव्हां ड्रम ह्मणजे बाजा वाजविण्याचें काम याजकडेस होतें. **वर्सेल्स** एथील राजवाड्यांत याची एक मोठी तसबीर काढलेली आहे. तींत त्यानें आपला डावा हात मुद्दाम एका ड्रमवर ठेवला आहे. यावरून याचा पू वींचा धंदा व्यक्त होतो. अशा प्रकारचीं उदाहरणें पाहून फ्रेंच शिपायांस आपलें कर्तव्य करण्यास एका प्रकारची उमेद येते, आणि यामुळें आपल्या कामांत ते फार दक्ष असतात; त्यांत त्यांच्या हातून काडीभर देखील कसू होत नाहीं.

याप्रमाणें सांगावीं तेवढीं उदाहरणें थोडकींच होणा आहेत. युरोपखंडांत दिवसेंदिवस अशा लोकांचीच संख्य ज्यास्त होत असल्यामुळें तिकडचा भरभराट विशेष हो आहे, हें आपण पाहतच आहों. उद्योगाचें फळ खचि मिळणार हें ते लोक पूर्णपणें जाणत असतात. यामुळें उ योग करण्यांत त्यांच्या हातून अगदीं कमताई होत नाहीं आणि ह्मणूनच तिकडे एखादा हलक्या कुळांतला जरी म नुष्य मोठ्या योग्यतेस चढला, तरी त्याचें त्या लोकांस फा रसें नवलही वाटत नाहीं. कारण अशीं शेकडों उदाहरणें नेहमीं त्यांच्या पाहण्यांत येतात. **विजापुरांत** ह्मणाले ह गळेच विजारवाले. त्यांतला हा प्रकार झाला आहे. परं इकडे आह्मांस या गोष्टीचा मोठा आचंबा वाटतो. आणि खरोखरीच न्हावी, धोबी, सुतार, सोनार, लोहार, चांभार, अ शांची मोठमोठ्या विद्वानांत गणना होणें ह्मणजे देशाचें त हानसान भाग्य नव्हे. या कनिष्ठ ह्मटलेल्या लोकांतून प्रसि द्धीस आले अशांचीं वर बरींच उदाहरणें सांगितलीं आहे



आणि पुढेंही कांहीं येतील. त्यांजविषयीं जर आपण नीट विचार केला तर आपल्यास असें दिसून येईल कीं ते जे मोठे झाले ते उगीच बसल्या ठिकाणीं नशीबाच्या जोरावर मोठे झाले नाहींत. त्यांनीं रात्रंदिवस मेहनत केली, श्रम केले, त्रास सोसले, सुखसोहळ्यांची आवड धरली नाहीं, ऐषआरामी भोगली नाहीं, चैन मारली नाहीं; आणि यामुळेंच त्यांची योग्यता वाढली, त्यांचा लौकिक झाला, आणि एकंदरींत ते आपल्या देशाचे मायबाप होऊन बसले. देशावर त्यांचे परोपरी उपकार झाले. या त्यांच्या ऋणांतून देशाची उतराई होणें कठीण. **इंग्लंडांत** पार्लमेंट ह्मणून जी सभा आहे तींत जुने कांहीं मानकरी आहेत, त्यांच्याशिवाय लोकांच्या वतीनें बरेच मुखत्यार जात असतात. त्यांस हौस आफ् कॉमन्स असें ह्मणतात. या हौस आफ् कॉमन्समध्यें अशा प्रकारच्या स्वतांच्या उद्योगानेंच वाढलेल्या लोकांची संख्या विशेष असते. त्यांचा जन्म अगदीं सामान्य प्रतीच्या लोकांत झाला असल्यामुळें, लोकांचें हित अनहित तें पूर्णपणें जाणत असतात. लोकांस कोणत्या गोष्टींची कमताई व जरूरी आहे हें त्यांस स्वतांच्या अनुभवावरून माहित असतें, यामुळें त्यांचे हक्क सांभाळण्यास ते नेहमीं तत्पर असतात. लोकांचे मुखत्यार हें नांव खरोखरी त्यांसच शोभतें आणि अशांचा पार्लमेंट सारख्या सभेंत प्रवेश व्हावा आणि त्यांच्या सल्ल्याशिवाय तेथील एक काडी देखील हलूं नये हें एक त्या देशास मोठें भूषण आहे. गिरण्यांतील लोकांस दहा तासांहून ज्यास्त काम पडूं नये अशाबद्दल इंग्लंडांत एक कायदा आहे. हा कायदा पार्लमेंट सभेंत कांहीं वर्षांपूर्वीं पास झाला तेव्हां त्याजबद्दल ति-

याच्या हातून होत असे. परंतु पहिल्यानें हा जेव्हां चाक-
रीस राहिला तेव्हां ड्रम ह्मणजे बाजा वाजविण्याचें काम
याजकडेस होतें. **वर्सेल्स** एथील राजवाड्यांत याची एक
मोठी तसबीर काढलेली आहे. तींत त्यानें आपला डावा
हात मुद्दाम एका ड्रमवर ठेवला आहे. यावरून याचा पू-
र्वीचा धंदा व्यक्त होतो. अशा प्रकारचीं उदाहरणें पाहून
फ्रेंच शिपायांस आपलें कर्तव्य करण्यास एका प्रकारची
उमेद येते, आणि यामुळें आपल्या कामांत ते फार दक्ष
असतात; त्यांत त्यांच्या हातून काडीभर देखील कसूर
होत नाहीं.

याप्रमाणें सांगावीं तेवढीं उदाहरणें थोडकींच होणार
आहेत. युरोपखंडांत दिवसेंदिवस अशा लोकांचीच संख्या
ज्यास्त होत असल्यामुळें तिकडचा भरभराट विशेष होत
आहे, हें आपण पाहतच आहों. उद्योगाचें फळ खचित
मिळणार हें ते लोक पूर्णपणें जाणत असतात. यामुळें उ-
द्योग करण्यांत त्यांच्या हातून अगदीं कमताई होत नाहीं
आणि ह्मणूनच तिकडे एखादा हलक्या कुळांतला जरी म-
नुष्य मोठ्या योग्यतेस चढला, तरी त्याचें त्या लोकांस फा-
रसें नवलही वाटत नाहीं. कारण अशीं शेकडों उदाहरणें
नेहमीं त्यांच्या पाहण्यांत येतात. **विजापुरांत** ह्मणाले स-
गळेच विजारवाले. त्यांतला हा प्रकार झाला आहे. परं-
इकडे आह्मांस या गोष्टीचा मोठा आचंबा वाटतो. आणि
खरोखरीच न्हावी, धोबी, सुतार, सोनार, लोहार, चांभार, अ-
शांची मोठमोठ्या विद्वानांत गणना होणें ह्मणजे देशाचें ल-
हानसान भाग्य नव्हे. या कनिष्ठ ह्मटलेल्या लोकांतून प्रसि-
द्धीस आले अशांचीं वर बरींच उदाहरणें सांगितलीं आहे



आणि पुढेंही कांहीं येतील. त्यांजविषयीं जर आपण नीट
विचार केला तर आपल्यास असें दिसून येईल कीं ते जे
मोठे झाले ते उगीच बसल्या ठिकाणीं नशीबाच्या जोरावर
मोठे झाले नाहींत. त्यांनीं रात्रंदिवस मेहनत केली, श्रम
केले, त्रास सोसले, सुखसोहळ्यांची आवड धरली नाहीं,
ऐषआरामी भोगली नाहीं, चैन मारली नाहीं; आणि या-
मुळेंच त्यांची योग्यता वाढली, त्यांचा लौकिक झाला,
आणि एकंदरींत ते आपल्या देशाचे मायबाप होऊन बसले.
देशावर त्यांचे परोपरी उपकार झाले. या त्यांच्या ऋणांतून
देशाची उतराई होणें कठीण. **इंग्लंडांत** पार्लमेंट ह्मणून जी
सभा आहे तींत जुनें कांहीं मानकरी आहेत, त्यांच्याशि-
वाय लोकांच्या वतीनें बरेच मुखत्यार जात असतात. त्यांस
हौस आफ् कॉमन्स असें ह्मणतात. या हौस आफ् कॉम-
न्समध्यें अशा प्रकारच्या स्वतांच्या उद्योगानेंच वाढलेल्या
लोकांची संख्या विशेष असते. त्यांचा जन्म अगदीं सा-
मान्य प्रतीच्या लोकांत झाला असल्यामुळें, लोकांचें हित
अनहित तें पूर्णपणें जाणत असतात. लोकांस कोणत्या
गोष्टींची कमताई व जरूरी आहे हें त्यांस स्वतांच्या अनुभ-
वावरून माहित असतें, यामुळें त्यांचे हक्क सांभाळण्यास ते
नेहमीं तत्पर असतात. लोकांचे मुखत्यार हें नांव खरोखरी
त्यांसच शोभतें आणि अशांचा पार्लमेंट सारख्या सभेंत
प्रवेश व्हावा आणि त्यांच्या सल्ल्याशिवाय तेथील एक
काडी देखील हलूं नये हें एक त्या देशास मोठें भूषण आहे.
गिरण्यांतील लोकांस दहा तासांहून ज्यास्त काम पडूं नये
अशाबद्दल इंग्लंडांत एक कायदा आहे. हा कायदा पार्ल-
मेंट सभेंत कांहीं वर्षांपूर्वीं पास झाला तेव्हां त्याजबद्दल ति-

कडे पुष्कळ वादविवाद झाला. त्या वेळेस **जोसेफ् ब्रॉद्रटन** या नांवाचा एक गृहस्थ **स्यांडफोर्ड** एथील लोकांच्या तर्फे पार्लमेंट सभेंत मुखत्यार असे. तो हल्लीं वारला, परंतु त्यावेळेस मजूर लोकांच्या वतीनें त्यानें तिकडे जें कांहीं भाषण केलें तें फारच चित्तवेधक होतें. **ब्रॉदरटन** हा स्वतां कांहीं दिवस गिरणींत हमालाचें काम करीत असे यामुळें त्या लोकांस तिकडे जे कांहीं हाल सोसावे लागत, ते तो पूर्णपणें जाणत होता आणि त्यांची स्थिति चांगली व्हावी ह्मणून त्याचे सतत प्रयत्न चालले होते. **ब्रॉदरटन** हा इतक्या हलक्या कुळांत जन्मला असेल असें कोणास स्वप्नीं देखील वाटलें नव्हतें. परंतु आतां जेव्हां त्यानें भर सभेंत आपला स्वतांचा अनुभव सांगितला तेव्हां सर्व लोक अगदीं थक्क झालें, आणि त्यांनीं त्याच्या उद्योगाची व शहाणपणाची फारच तारीफ केली. सर **जेम्स ग्राहाम** ह्मणून एक मोठा मानकरी तेथें बसला होता त्यानें तर त्याची फारच स्तुति केली. तो ह्मणाला कीं अशा हलक्या कुळांतल्या मनुष्यानें आमच्या शेजारी बरोबरीच्या नात्यानें बसावें हें **इंग्लंड** देशाचें भाग्यच समजलें पाहिजे. अशा प्रकारचे पराक्रमी पुरुष या सभेंत आहेत हें केवळ आह्मांस भूषण आहे, हें मीच ह्मणतों असें नव्हे तर याजबद्दल प्रत्येक विचारी व सुज्ञ मनुष्याची अंतर्देवता साक्ष देत आहे. हे शब्द ऐकण्या बरोबर सर्वांच्या तोंडून 'शाबास, शाबास,' असाच ध्वनि निघाला आणि टाळ्यांचा तर जसा काय गजर उडाला.

**फॉक्स** ह्मणून **ओल्डह्याम** एथील लोकांच्या तर्फे कांहीं दिवस एक मुखत्यार असे. त्यानें लहानपणीं को-



ष्ट्याच्या मागावर बरेच दिवस काम केलें होतें. यामुळें त्याला कांहीं जुन्या गोष्टी सांगायाच्या असल्या ह्मणजे त्यानें त्या या काळास अनुलक्षून सांगाव्या. ह्मणजे असें कीं जर कोणी त्याला विचारलें कीं कांहो ती अमकी अमकी गोष्ट कधीं घडून आली तर मी जेव्हां मागावर काम करीत असे तेव्हां, किंवा त्याच्या अगोदर, किंवा नंतर अशा रीतीनें त्यानें जबाब द्यावा. आपल्या पूर्वीच्या धंद्याबद्दल त्याला वाईट ह्मणून अगदीं वाटत नसे, परंतु तशा स्थितींतून आपण एवढ्या मोठ्या योग्यतेस चढलों याचें मात्र त्याला मोठें भूषण वाटे. आणि खरोखरीच त्यांत वाईट तें काय आहे? ईश्वरानें ज्या स्थितींत आपल्यास निर्माण केलें तींतच आनंद मानून ती यथाशक्ति सुधारण्याचा प्रयत्न करणें हेंच शहाण्या माणसाचें काम आहे. असो, अशा प्रकारचे पार्लमेंट सभेंत आजपर्यंत अनेक सभासद होऊन गेले आणि त्यांतून हल्लीं कांहीं जीवंतही आहेत. **लिंड्से** याची आजकाल सर्वत्र प्रसिद्धि आहे. तो मोठा श्रीमान् गृहस्थ असून त्याची व्यापाराचीं शेंकडों गलबतें आहेत. तो कांहीं वर्षांपूर्वी **संडर्लंड** एथील मुखत्यार असे. एक वेळ अशी गोष्ट झाली कीं पार्लमेंट सभेंत त्याचे कित्येक प्रतिस्पर्धी लोक होते त्यांनीं त्याजवर कांहीं खोटा आरोप ठेवला. तेव्हां त्या लोकांस जबाब देतेवेळेस त्यानें आपल्या आयुष्याची सर्व हकीगत सांगितली. तो मूळ **ग्लासगो** एथील राहणारा. चौदा वर्षांचा झाला तेव्हां त्याचे आईबाप वारले यामुळें तो अगदीं निराश्रित झाला आणि पुढें काय करावें याची त्यास मोठी पंचाईत पडली. शेवटीं **लिव्हर्पूल** ह्मणून एक मोठें व्यापाराचें ठिकाण आहे,

तिकडे जाऊन कांहीं तरी पोटाचा धंदा करावा असा त्यानें निश्चय केला. परंतु हें झालें तरी त्यावेळेस बरेंच खर्चाचें काम असे. आगबोटीचे पैसे देखील देण्याचें त्याला सामर्थ्य नव्हतें. यामुळें **कमाना**जवळ जाऊन पैशांच्या ऐवजीं आगबोटीवर कांहीं तरी काम करण्याचें त्यानें कबूल केलें. **कमाना**नें त्याला कोळसे भरण्याचें काम नेमून दिलें. अशा रीतीनें तो **लिवर्पूल** एथें जाऊन पोंचला. तेथें महिना दोन महिने गेले तरी चाकरी कांहीं कोठें मिळेना. धर्मशाळेंत राहून कसा तरी तो आपला निर्वाह करीत असे. यामुळें त्याचे बुरे हाल झाले. शेवटीं एका तारवावर त्याला कांहींशी चाकरी मिळाली. ती अगदीं हलक्या प्रतीची होती तरी त्यानें ती पतकरली, आणि चार पांच वर्षें गेलीं नाहींत तोंच स्वतांच्या हुशारीनें आणि प्रामाणिकपणानें आपल्या वयाच्या एकुणिसाव्या वर्षींच तारवावरील खुद्द **कमाना**ची त्यानें जागा मिळविली. कांहीं वर्षें गेल्यानंतर त्याच्याजवळ थोडासा पैसा झाला आणि मग त्यानें ती चाकरी सोडली, आणि मुंबईसारख्या एका मोठ्या शहरांत राहून बसल्याबसल्या कांहीं व्यापार सुरू केला. त्यांत त्याची लौकरच भरभराट झाली आणि यामुळें हल्लीं त्याची मोठमोठ्या लाखोंपतींत गणना होत असते. त्यानें एक ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं 'मी जो आज एवढा वाढलों तो केवळ माझ्या स्वतांच्या उद्योगानें आणि मेहेनतीनें. मीं सतत श्रम केले आणि अवघ्या जन्मांत कोणाला बुडविण्याची ह्मणून मीं इच्छा ठेवली नाहीं. दुसऱ्यांनीं आपल्याशीं लबाडी करूं नये हें जर आपल्यास इष्ट तर आपणही दुसऱ्यांशीं लबाडी करूं नये हें उघडच आहे. याप्रमाणें मी माझा व्यवहार ठेवला; ह्मणूनच ईश्वरानें मला हरएक कामांत यश दिलें असें मी समजतों.'



**वुइलिअम ज्याक्सन** ह्मणजे कांहीं वर्षांपूर्वी जो **डार्बी** एथील लोकांच्या तर्फे पार्लमेंट सभेंत काम करीत असे याचीही कांहींशी अशीच हकीगत आहे. त्याचा बाप वैद्यकीचा धंदा करीत असून त्याची मिळकतही बरीच असे. परंतु घरांत बसून खाणारीं माणसें फार आणि मुलांची समृद्धि विशेष असल्यामुळें त्याच्या उत्पन्नास व खर्चास बरोबर मेळ पडत नसे. त्यानें पुष्कळ पैसे मिळविले परंतु त्यांची नीट व्यवस्था करण्याचें शहाणपण त्याच्या अंगीं नव्हतें. त्याला एकंदर अकरा मुलें झालीं. त्यांतून कांहीं **वुइलियम**पेक्षां मोठीं व कांहीं लहान होतीं. मोठीं होतीं त्यांचा थोडासा विद्याभ्यास झाला होता, परंतु **वुइलियम** आणि त्याचे धाकटे तीन चार भाऊ हे अगदीं लहान असल्यामुळें त्यांनीं कोठें नुक्तीच शाळेंत जाण्याची सुरुवात केली होती, आणि इतक्यांत दुर्दैवानें कांहीं आजार होऊन त्यांचा बाप एकाएकींच मरण पावला. तेव्हां लहान पोरें अगदीं उघड्यावर पडलीं. कारण बापानें त्यास जन्म मात्र दिला; परंतु त्यांच्या पोटाची किंवा विद्याभ्यासाची त्यानें कांहींच तजवीज केली नव्हती. मिळालेला सर्व पैसा त्यानें खाण्यापिण्यांतच घालवावा. **वुइलियम**ला पुरीं बारा वर्षें देखील झालीं नव्हतीं आणि इतक्यांत हा अनर्थ गुदरला, यामुळें आतां त्याचा अभ्यासबिभ्यास तसाच राहिला. पोटाच्या मागें जिकडे वाट मिळेल तिकडे त्यास जाणें भाग पडलें. बापाचा एक स्नेही होता त्यानें त्याला गोदींत तारवावर कांहींसें काम लावून दिलें. दुसऱ्या मु-

ल्यांचीही अशाच प्रकारें कांहींनाकांहीं व्यवस्था झाली **वुइलियम**ला सकाळचे सहा वाजल्यापासून तों रात्रीचे नऊ वाजेपर्यंत तारवावर एकसारखें काम पडत असे, यामुळें तिकडे त्याचे पुष्कळ हाल होत असत. तरी नशीबानें तें काम लौकरच आटपलें आणि नंतर त्याला एका आफिसांत शिपायाची चाकरी मिळाली. इकडे मात्र त्याला फारसें काम पडत नसे. यामुळें फुरसतीचा वेळ तो अभ्यासांत घालवी. त्याला थोडें थोडें वाचतां येत असे, यामुळें मिळालेलें पुस्तक पहिल्यापासून तों शेवटपर्यंत त्यानें वाचून टाकावें. असा क्रम चालला असतां '**एनसायक्लोपिडिआ विद्यानिका**' ह्मणून इंग्रजींत एक मोठा ग्रंथ आहे तो तेथें त्याच्या पाहण्यांत आला. हा ग्रंथ मोठा असून हजार हजार पानांचे त्याचे सरासरी वीस भाग आहेत. यांत सर्व कांहीं विषयांवर उत्तम प्रकारची माहिती दिली असून त्याची रचना इंग्रजी कोशाच्या पद्धतीवर केली आहे. हा ग्रंथ मधून मधून ए पासून तों झेड् पर्यंत त्यानें लक्ष लावून वाचला. यामुळें त्याला अवघ्या विषयांचें बरेंच ज्ञान झालें. कांहीं दिवस तेथेंच राहून त्यानें जवळ थोडासा पैसा सांठविला आणि नंतर ती चाकरी सोडली, आणि स्वतांच्या जोखमावर कांहीं लहानसा व्यापार सुरू केला. जात्याच तो हुषार आणि उद्योगाचीही त्याजजवळ कांहीं कमताई नव्हती यामुळें त्याचा व्यापार दिवसेंदिवस वाढत गेला आणि हल्लीं तो इतका कांहीं श्रीमान् झाला आहे कीं व्यापाराच्या निमित्तानें त्याचीं गलबतें पृथ्वीच्या पाठीवर सर्व ठिकाणीं जात येत आहेत आणि त्याचा व्यापार जिकडे नाहीं असा एक देखील देश मिळणें कठीण.



**रिचर्ड कॉब्डेन** याचीही अशाच प्रकारच्या स्वतःसिद्ध लोकांत गणना होत असते. तोही घरचा असाच अगदीं गरीब असे. **मिड्हर्स्ट** ह्मणून एक गांव आहे तेथें त्याचा बाप शेतांत खपून कुटुंबरक्षण करीत असे. **रिचर्ड** हा सात आठ वर्षांचा झाला नाहीं तोंच घरची गरीबी असल्यामुळें आईबापांनीं त्याला लंडन शहरांतील एका वखारींत काम करण्याकरतां ह्मणून पाठवून दिलें. मुलगा स्वभावानें फार चांगला असून आपल्या कामांत चुकवाचुकव कधीं करीत नसे, यामुळें धन्याचा त्याजवर विशेष लोभ बसत चालला. पहिल्यापासून त्याला पुस्तकें वगैरे वाचण्याचा फार नाद होता, परंतु एवढें मात्र त्याच्या धन्याला अगदीं आवडत नसे. तो कांहींसा जुन्या तऱ्हेचा माणूस होता यामुळें पुस्तकें फार वाचलीं ह्मणजे डोकें फिरतें अशी त्याची कांहीं विलक्षण समजूत झाली होती. ह्मणून तसें न करण्याविषयीं तो त्याला नेहमीं सांगत असे. परंतु यानें कांहीं आपला क्रम सोडला नाहीं. मिळालेलें पुस्तक वाच, अशा रीतीनें त्यानें पुष्कळ माहिती करून घेतली आणि कामांत त्याची अधिकाधिक हुशारी दिसून येत चालली यामुळें दिवसेंदिवस त्याची बढती होत गेली. कामाच्या संबंधानें तो पुष्कळ देश फिरला आणि बऱ्याच ठिकाणीं त्याची ओळख झाली. दोन पैसेही शिल्केस पडले. नंतर त्यानें ती चाकरी सोडली आणि चिटें छापण्याचा स्वतां एक लहानसा कारखाना उभारला. त्यांत त्याला बरीच कमाई झाली. नंतर स्वतांचा धंदा संभाळून लोकोपयोगी कामांत तो आपला कांहीं वेळ घालवूं लागला. गरीबगुरीबांस विद्या मिळावी याजबद्दल त्याचे सतत परिश्रम चालले होते. पर-

मुलखांतून धान्य आल्यामुळें देशांतील शेतकीस धक्का पोंचतो ह्मणून बाहेरून धान्य येण्यास मनाई असावी किंवा त्याजवर जबर कर असावा अशा अर्थाचे इंग्लंडांत वेळोवेळीं कायदे पास झाले; त्यांस **कॉर्न लॉस** असें ह्मणतात. अशा प्रकारचे व्यापारास अडथळा आणणारे कायदे नसावेत ह्मणून त्यानें पार्लमेंट सभेंत पुष्कळ वादविवाद केला आणि शेवटीं त्यानें आपलें ह्मणणें खरें केलें. या संबंधानें एक मोठी लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे ती अशी कीं, पहिल्याच खेपेस पार्लमेंट सभेंत यानें जें भाषण केलें त्यांत कांहीं याची फारशी विद्वत्ता दिसून आली नाहीं. विषयाची जुळणी बरोबर न करतां आल्यामुळें एकंदरींत त्या खेपेस त्याचा फजीताच झाला. परंतु अशानें त्याची उमेद खचली नाहीं; त्यानें आपला प्रयत्न तसाच चालू ठेविला, त्यांत कांहीं कमताई केली नाहीं; रात्रंदिवस मेहेनत केली, पुस्तकांची पुस्तकें पाठ केलीं; या सभेंत जा, त्या सभेंत जा असें करून त्यानें आपला बोलण्याचा प्रघात वाढविला आणि यामुळें असें झालें कीं, पार्लमेंट सभेंत त्यावेळचे जे मोठमोठे वक्ते होते त्यांत त्याची गणना होऊं लागली. **सर रॉबर्ट पील** हा ह्मटलें असतां त्याच्या प्रतिपक्षाचा नायक, परंतु त्यानें देखील त्याची विद्वत्ता व वक्तृत्वशक्ति कबूल करावी. **डून डी लुई** या नांवाचा एक फ्रेंच ग्रंथकार होऊन गेला. तो यावेळेस आपल्या सरकारच्या मार्फत इंग्लंडांत वकीली करीत असे. त्यानें याजविषयीं एका ठिकाणीं असें ह्मटलें आहेः—'उद्योग व निश्चय हे दोन गुण मनुष्याच्या अंगीं असले ह्मणजे त्याच्या स्थितींत कसा फेर पडतो हें **कॉब्डेन** याच्या उदाहरणावरून स्पष्ट दिसून येतें. त्याची पहि-



ल्यानें अगदीं गरीब स्थिति होती, परंतु नुसत्या उद्योगानें आणि शहाणपणानें तो एवढ्या मोठ्या योग्यतेस चढला. लोकांत त्याची चहा झाली आणि तो सर्वांस प्रिय झाला. उद्योग, साहस, प्रामाणिकपणा व बंधुप्रीति वगैरे ज्या ज्या कांहीं अमोलिक गुणांबद्दल इंग्रज लोकांची प्रसिद्धि आहे ते सर्व याच्या ठिकाणीं भरले होते. असे भाग्यशाली पुरुष या दुनयेंत फारच थोडे निपजतात.'

या सर्व उदाहरणांवरून आपल्यास असें ह्मणतां येईल कीं मनुष्याला जर आपली बढती होणें हें इष्ट आहे तर कंबर बांधून त्यानें सतत उद्योग केला पाहिजे, परिश्रम केले पाहिजेत; आणि त्यांत जर कां कमताई झाली आणि आळसाचाच विशेष प्रादुर्भाव होत गेला तर अशा मनुष्याच्या हातून कसें जरी क्षुल्लक काम असलें तरी तें तडीस जाणें कठीण. विद्या संपादन करणें किंवा शहाणपणानें दोन पैसे मिळविणें ही आळशी मनुष्यांचीं कामें नव्हत. त्यांजकरतां श्रमच केले पाहिजेत. श्रमाशिवाय या गोष्टी साध्य होत नसतात. श्रीमंत लोक ह्मणजे ज्यांनां खाण्यापिण्याची कोणत्याच प्रकारची ददात नसते आणि पैशाच्या बळावर ज्यांनां सर्व कांहीं साध्य होत असतें, अशांनां देखील उद्योगाची आवश्यकता आहे. त्यांनीं स्वतां जर उद्योग केला नाहीं तर घरचे ते कोट्याधीश जरी असले तरी खरोखर मानमान्यता ह्मणून जी कांहीं आहे ती त्यांस मिळणें नाहीं. ती मिळणें हें त्याच्या स्वतांच्या हुशारीवर व शहाणपणावर आहे. बापाच्या पश्चात् बापाची संपत्ती मात्र मुलांस मिळते, परंतु त्याची अकल व त्याचें शहाणपण हीं त्यास लाभत नाहींत. त्यांजबद्दल त्यांनीं स्वतां उद्योग केला पाहिजे.

आणि अशाविषयीं पहिल्यापासून जर योग्य खबरदारी ठेवली नाहीं तर ती वडिलोपार्जित आलेली संपत्तीही पण लौकरच नाहींशी होते. याजबद्दल उदाहरणें शोधण्यास इंग्लंड देशांत जाण्याची जरूरी नाहीं. त्यांची या आपल्या देशांतही पुष्कळ समृद्धि आहे. बापाच्या वेळची दौलत मुलाच्या किंवा नातवाच्या हयातींत तशीच राहील याची या देशांत खात्री देववत नाहीं. कारण उघडच आहे. आळसाचीच सर्वत्र प्रवृत्ति झाली असून त्याच्या सहवासानें असणारे जे नानाप्रकारचे अनाचार त्यांचाही पूर्ण अंमल गाजत आहे. संपत्ती किती जरी असली तरी तिजपासून बाजारांत जाऊन पाहिजेल तो जिन्नस विकत घेतां येईल, चाकर माणसें ठेवतां येतील, चैन मारतां येईल, सर्व कांहीं करतां येईल, परंतु अकलेची जर थोडीशी कमताई आहे तर ती मात्र मिळणें कठीण. ती फार दुर्मीळ आहे; ती पैसा देऊन मिळत नाहीं. तिच्याकरतां उद्योगच केला पाहिजे आणि तो ज्याचा त्यानें स्वतां केला पाहिजे. दुसऱ्यांनीं उद्योग करूनही कांहीं होणें नाहीं. कारण स्वतांचें शहाणपण असल्याशिवाय दुसऱ्याच्या शहाणपणापासून मनुष्यास या जगांत फारसा उपयोग होत नाहीं. असो, यावरून एकंदरींत निष्पन्न काय झालें तर, उद्योग हा प्रत्येक मनुष्यास अवश्य आहे, मग तो श्रीमंत असो किंवा गरीब असो. **ड्रयू, गिफोर्ड** आणि **ह्यू मिलर** यांजविषयीं वर सांगितलेंच आहे कीं त्यांचा अगदीं हलक्या कुळांत जन्म झाला होता आणि अशा मनुष्यांस देखील जर उद्योगाचें फळ मिळालें आहे, तर ज्यांची संपत्ति मोठी आणि ज्यांस सर्व कांहीं अनुकूळ अशांचा उद्योग कसा बरें निष्फळ होईल? खचीत होणार नाहीं.



मनुष्याजवळ दोन पैसे असून तो जर घरचा खाऊन पिऊन सुखी आहे, तर बहुतकरून अशा मनुष्यास विद्याभ्यास किंवा कोणताही धंदा अथवा उदीमव्यापार करूं ह्मटल्यास फारसें कठीण पडत नाहीं. तरी एवढ्यावरूनच आपल्यास असें ह्मणतां येत नाहीं कीं हीं अशा प्रकारचीं कामें करण्यास पैसा ह्मणजे खरोखर पाहिजेच. पैसा नसला तर तेवढ्याकरतांच तीं अगदीं अडून राहिलीं असें कधींही होत नाहीं. असें जर असतें तर वर सांगितले अशा प्रकारचे महान् महान् पराक्रमी पुरुष या जगांत होतेच ना. त्यांच्याजवळ कोठें पैसा होता आणि ते कधीं घरचे श्रीमंत होते? परंतु केवढा त्यांचा पराक्रम आणि केवढी त्यांची योग्यता! देश सर्वप्रकारें त्यांचा ऋणी होऊन बसला आहे. बरें, पैसा असला, तर त्याचा ह्मणजे परिणाम नेहमीं चांगलाच होतो असेंही नाहीं. खायाला प्यायाला सर्व कांहीं यथास्थित असलें ह्मणजे उद्योग करावा ही कल्पना देखील मनुष्यास सुचत नाहीं. फार तर काय, परंतु तसें करण्याची त्यास जरूरीच दिसत नाहीं. कारण अशांच्या मतें उद्योग ह्मणून जो कांहीं करणें तो सर्व पोटासाठीं, आणि त्याची जर वडिलांच्या कृपेनें ददात राहिली नाहीं तर त्यांनीं काय ह्मणून विनाकारण झाडास त्रास द्यावा हें उघडच आहे. अशा प्रकारचे एकंदर विचार असले ह्मणजे आळसाचीच विशेष समृद्धि होऊन या श्रीमान् ह्मटलेल्या लोकांस कोणच्याच प्रकारची मेहेनत तोलेनाशी होते; आणि यामुळें पुढें जर कदाचित् वाईट दिवस आले तर त्यांला पाठ देण्याचें त्यांच्या अंगीं सामर्थ्य राहत नाहीं. आपल्यामध्यें काय दम आहे आणि कोणच्या गोष्टींचा आपल्या हातून निभाव लागेल हेंच मुळीं

त्यांस समजत नाहीं. तेव्हां अशांच्या हातून पराक्रम तो कसचा होणार हें उघडच दिसत आहे. परंतु तीच माध्यान्हाची पंचाईत असली ह्मणजे मनुष्यांस कांहीं ना कांहीं उद्योग करणें भाग पडतें; एका ठिकाणीं न साधला तर दुसऱ्या ठिकाणीं प्रयत्न करावा लागतो आणि यामुळें केव्हां केव्हां असें होतें कीं उद्योग करणें हें एका प्रकारचें जसें काय त्यांस व्यसनच होऊन जातें. हा प्रकार वर सांगितलेल्या उदाहरणांत घडून आला यामुळें त्या त्या मनुष्यांची योग्यता इतकी वाढली. ह्मणून जर आपल्यास कदाचित् गरीबी आली तर त्याजबद्दल आपण मनांत फारसा खेद मानूं नये. तिजमुळें आपल्या उद्योगास बळकटी येते, उत्साह वाढतो, आणि पुढें हरएक प्रकारें ती आपल्या सुखास साधनीभूत होते. आतां एवढें खरें आहे कीं जे जात्याच आळशी, स्वाभिमान ह्मणजे काय हें ज्यांस मुळींच माहीत नाहीं, अशा मनुष्यांची किती जरी वाईट स्थिति झाली, तरी तींतून आपली सुटका करण्यास ते किंचित्‌ही प्रयत्न करणार नाहींत आणि यामुळें जन्मवर ते त्याच स्थितींत रखडत राहतील. परंतु ज्यांचा स्वभाव उद्योगी, ज्यांस कांहीं सारासार विचार, आणि जे महत्त्वाकांक्षी अशांनां गरीबी येणें ह्मणजे ती केवळ ईश्वरी कृपाच समजली पाहिजे. तीजपासून खरोखर त्यांची उन्नतिच होणार आहे. बेकननें एका ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं 'पैसा असला ह्मणजे पाहिजेल तें काम करतां येईल असा लोकांचा समज असल्यामुळें पैशालाच ते विशेष मान देतात. परंतु ही त्यांची मोठी चूक आहे. पैशाशिवाय उद्योगाच्या बळावरच ज्या कांहीं गोष्टी घडून आल्या आहेत त्यांचा ते बिलकुल विचार करीत



नाहींत, यामुळें स्वतांच्या उद्योगाच्या मातब्बरीविषयीं ते अगदीं अजाण असतात, आणि ह्मणूनच आपला सर्वप्रकारें भरिभार दुसऱ्यांवर घालण्यास ते नेहमीं तत्पर असतात. परंतु मनुष्यानें जर करावा तसा उद्योग केला आणि होईल तितकें आपलें मन स्वाधीन ठेवलें तर बहुतकरून दुसऱ्यांच्या दारांशीं जाण्याचा त्याला कधींही प्रसंग येणार नाहीं, आणि स्वतांचें व कुटुंबाचें संरक्षण करण्यास त्याला फारसे आयासही पडणार नाहींत. अशा प्रकारें स्वतांच्या मेहेनतीनेंच जी कांहीं भाजीभाकर मिळते तिची गोडी कांहीं विशेष असते आणि तीच शरीरास फार सुखावह होते, आणि तींतच समाधान मानून राहिल्यास कोणच्याही प्रकारें या जगांत मनुष्याला लबाडी करण्याची जरूरी राहत नाहीं व गांठीस चार पैसे पडून पदरीं पडलेल्या माणसांस सुखाचाच वांटा विशेष मिळत जातो.'

पैसा हा मोठा वाईट आहे. तो असला ह्मणजे मनुष्यास उद्योग नकोसा होतो, नाहीं नाहीं ते ढंग सुचतात आणि एकदरींत आळसांत व बडेजावी भोगण्यांतच त्याचा बहुतेक वेळ जातो. हें ह्मणणें आमच्या या हिंदुस्थानांतील लोकांसच पुष्कळ अंशीं लागू आहे, आणि आतां जरी असलेली आमची संपत्ति नाहींशी झाली तरी आमच्या बडेजावींत मात्र अद्याप फारशी कमताई झाली नाहीं. परंतु इंग्लंड देशांत हा प्रकार नाहीं. तेथें मोठमोठे श्रीमान् लोक आहेत आणि त्यांची संपत्ती इतकी कांहीं मोठी आहे कीं तिच्यापुढें आमची होती जी संपत्ति ती कांहींच नाहीं असेंही ह्मणतां येईल. असें जरी आहे तरी तेथील अशा प्रकारच्या बहुतेक लोकांचा वेळ नेहमीं कांहींना कांहीं सदुद्योग करण्यांतच जातो.

आपल्या देशाकरतां व देशबांधवांकरतां पाहिजेल तें काम करण्यास ते तयार असतात. अशाविषयीं ते मान अभिमान फारसा पाहात नाहींत. स्वतांच्या व्यक्तिरूप सुखाकडे त्यांचें फारसें लक्ष नसतें. यामुळें कसें जरी मोठें संकट आलें तरी ते मागें हटत नाहींत आणि आपल्या कर्तव्यांत त्यांजकडून कधींही आळस होत नाहीं. हें खरोखर त्या लोकांस मोठें भूषण आहे. याजबद्दल त्यांची तारीफ करावी तेवढी थोडकीच होणार आहे. जीपासून आपल्या देशाचें खरोखर कल्याण होईल अशीच ते आपल्या राजास नेहमीं सल्ला देतात, एवढेंच नव्हे तर प्रसंग पडल्यास कंबर बांधून स्वतां लढाईंत देखील जाण्यास ते मागें पुढें पाहत नाहींत. **स्पेन**देशाच्या संबंधानें **नेपोलिअन** बरोबर मागें इंग्रजांची जी लढाई झाली त्या लढाईंत मोठमोठे श्रीमंत लोक, ज्यांना कशाचीही कमताई नव्हती असे देखील आपल्या देशाकरतां लढण्याच्या इराद्यानें गेले होते. त्यांत एक पलटणीचा नाईक होता, तो आपल्या पलटणीबरोबर उन्हातान्हाचे हाल सोसून एकटाच चाकर माणसांशिवाय डोंगराळ व कांटेऱ्या जमिनीवरून हातांत बंदूक घेऊन पायीं चालला असे. त्यानें आपल्या कर्तव्यापुढें स्वतांच्या शरीराची देखील फारशी परवा बाळगली नाहीं. परंतु नंतर असें समजलें कीं ती सरासरी दीड लाखाची असामी होती, ह्मणजे वर्षाचें दीड लाखाचें त्याचें अगदीं निवळ उत्पन्न होतें. हेंचसें काय परंतु **क्रिमिअनवार** ह्मणून **रुशिआ**बरोबर इंग्रजांची जी लढाई झाली तींत देखील पुष्कळ बड्या बड्या लोकांनीं आपल्या पैशाचा किंवा मोठेपणाचा पोकळ अभिमान न धरतां, नाहीं नाहीं तीं संकटें सोसलीं आणि आपली



व आपल्या देशाची बूज राखली. **हिंदुस्थान**ची उष्ण हवा तर पहिल्यापहिल्यानें या लोकांस अगदीं मानत नसे तरी भावी सुखाकडे लक्ष देऊन स्वतांच्या प्रयत्नांत त्यावेळेस त्यांनीं कमताई केली नाहीं. या सर्व अचाट उद्योगाचें फळ ते लोक आजरोजीं कोणच्या रीतीनें अनुभवीत आहेत हें आपण पाहतच आहों.

आमच्या या देशांत विद्या ह्मणून जी कांहीं शिकणें ती बहुतकरून गरीब ह्मणजे सरकारी चाकरी करून ज्यांस पोट भरणें आहे अशा लोकांनींच शिकावी असा लोकांचा कांहीं विलक्षण समज झाला आहे. यामुळें श्रीमंत लोकांचीं मुलें बहुधा अक्षरशत्रुच राहतात ही गोष्ट पुष्कळांच्या पाहण्यांत आहे. त्यांस विद्येची गोडी नसते आणि सर्वप्रकारें आळसांत व चैनींतच त्यांचा काळ जातो. त्यांस नाहीं नाहीं तीं व्यसनें जडतात आणि एकंदरींत स्वतांच्या दुर्वर्तनानें वाडडिलांच्या नांवांस ते काळिमाच आणतात. परंतु **इंग्लंड** देशांत याच्या अगदीं उलट प्रकार आहे. तिकडे गरीब असो किंवा श्रीमान् असो सर्वांनीं विद्याभ्यास ह्मणून केलाच पाहिजे. यामुळें आजपर्यंत त्या देशांत जे कोणी मोठमोठे विद्वान पंडित होऊन गेले त्यांच्यामध्यें **अर्ल्स, ड्यूक्स** वगैरे बड्या बड्या मानकऱ्यांच्या मुलांचीही संख्या बरीच पाहण्यांत येते. **बेकन**चें घराणें ह्मटलें असतां लहानसान नव्हे. त्याच्या बापास **इलिझाबेथ** राणीच्या वेळेस प्रधानकीचीं वस्त्रें मिळालीं होतीं आणि त्याचे काका, मामा वगैरे अगदीं निकट आप्तसंबंधी हे देखील दरबारांतील मोठमोठीं कामें पाहत असत. तरी **बेकन**नें आपला सर्व काळ अभ्यासांतच घालविला. यामुळें तो मोठा विद्वान् पंडित झाला. त्यानें

लिहिलेले ग्रंथ आज काल सर्वमान्य झाले आहेत आणि तत्त्वविचारी ह्मणून जे कोणी **युरोपखंडांत** असंख्य पंडित होऊन गेले त्या सर्वांत त्यास हल्लीं पहिली जागा मिळत असते. **बॉइल, क्यावेंडिश** आणि **ट्यालबॉट** हीं सर्व मोठमोठ्या मानकऱ्यांचीं मुलें. **बॉइल** हा **अर्ल** आफ **कॉर्क** याचा मुलगा, परंतु **न्यूटन**च्या आणि याच्या योग्यतेंत फारसें अंतर नव्हतें. रसायनशास्त्रावर याचे अनेक ग्रंथ आहेत. किमया करण्याचें याच्यावेळेस इंग्लंडांतील लोकांस फार वेड लागलें होतें, तें यानें पुष्कळ अंशीं नाहींसें केलें. **ट्यालबॉट** आणि **क्यावेंडिश** यांची विद्वत्ताही अशीच. फोटोग्राफी ह्मणजे सूर्याच्या प्रकाशानें हुबेहुब चित्रें काढण्याची जी विद्या आहे तींत **ट्यालबॉट** यानें पुष्कळ सुधारणा केली. **रॉस** याची यंत्रविद्येंत फार प्रसिद्धि आहे. हाही एका **अर्ल**चा मुलगा असल्यामुळें याला दुसरीं आणखी हजारों कामें पाहवीं लागत, नाहीं तर या विषयाच्या संबंधानें याची आणखी पुष्कळ प्रसिद्धि झाली असती. सुतार व लोहार काम तो फारच उत्तम रीतीनें जाणत असे. यामुळें एकवेळ असें झालें कीं एका लहानशा कारखान्याच्या मालकानें तो कोण व त्याचा हुद्दा काय हें माहीत नसल्यामुळें आपल्या कारखान्यांत मेस्त्रीची जागा पतकरण्याविषयीं त्याला फार आग्रह केला. **रॉस टेलिस्कोप** ( दुर्बीण ) ह्मणतात ती याच्याच नांवावरून. ती पहिल्यानें यानें तयार केली. तिचा ज्योतिष शास्त्रांत फार उपयोग आहे. असें ह्मणतात कीं अशा प्रकारच्या दुर्बिणीची युक्ति आजपर्यंत दुसऱ्या कोणीं शोधून काढली नाहीं.

शिवाय या बड्या लोकांचा वेळ ह्मटला ह्मणजे बहुतकरून



लोकोपयोगीं कामें करण्यांतच पुष्कळ जातो. लोकांचें हक्क सांभाळून राज्यास खरोखर बळकटी येईल अशाविषयीं **पार्लमेंट** सभेंत त्यांचे सतत प्रयत्न चाललेले असतात. या शिवाय शास्त्रीय वगैरे विषयांवर इंग्रजी भाषेंत जीं कांहीं मासिक किंवा त्रैमासिक पुस्तकें निघत असतात त्यांत त्यांचें पुष्कळ अंग असतें. इतिहासग्रंथ, कल्पित कादंबऱ्या, नाटकें, व निबंध वगैरे लिहिण्याचाही या लोकांस बराच नाद असतो. आतां हीं इतकीं कामें करणें ह्मणजे त्यांस कोणच्या प्रकारचा उद्योग व मेहेनत करावी लागत असेल हें सांगण्याची जरूर नाहीं. त्याची वाचणारांस सहज अटकळ होणार आहे. हें तर काय परंतु इंग्लंडांतील खुद्द जें प्रधानमंडळ त्याला तर पार्लमेंट सभा सुरू असली ह्मणजे शुद्ध हमालांप्रमाणें चाकरी करावी लागते. त्यांच्यासारखी मेहेनत दुसऱ्या कोणांस पडत नसेल; आणि ज्यांना ज्यांना ह्मणून आजपर्यंत प्रधानकीचीं वस्त्रें मिळालीं आहेत त्यांनीं त्यांनीं अशा रीतीनें आपल्या देशाची व राजाची इमानानें चाकरी केली आहे. असें जर ते न करतील तर तिकडे त्यांचा एक दिवस देखील निभाव लागणार नाहीं. **लॉर्ड पामर्स्टन, डार्बी, रसेल, ग्लाड्स्टन** आणि **डिस्राएली** वगैरे मोठमोठ्या गृहस्थांचीं नांवें ऐकलीं ह्मणजे अगोदर त्यांची संपत्ति आणि त्यांचें वैभव हीं आमच्या मनांत येतात. परंतु या सर्वांनीं अशा प्रकारची हमाली केली आहे व त्यांतून कांहीं हल्लीं ती करीतही आहेत. गिरण्यांतील लोकांस दहा तासांहून ज्यास्त काम पडूं नये अशाबद्दल इंग्लंडांत कायदा आहे हें वर सांगितलेंच आहे आणि तो कायदा या लोकांनींच पास केला. परंतु यांनां

स्वतांना दहा तासच नव्हे तर रात्रंदिवस एक सारखी मेहनत करावी लागते यामुळें एक घडीभर देखील त्यांस पुरी विश्रांती मिळत नाहीं. सर **रॉबर्ट पील** याला ह्मणजे फार वर्षें झालीं असें नाहीं. तो अलीकडेच सरासरी वीस बावीस वर्षांपूर्वी इंग्लंडांतील प्रधानमंडळाचा आपल्यास नायक ह्मणवीत असे. याचा उद्योग आणि याची मेहेनत हीं केवळ अप्रतिम होतीं. याचें मन ह्मटलें ह्मणजे नेहमीं कांहीं ना कांहीं कामामुळें अगदीं व्यग्र असे. त्याला एक क्षणभर देखील पुरा विसावा मिळूं नये. याचा एकंदर आयुष्यक्रम पाहून जड बुद्धीच्या देखील मनुष्यास, उद्योग व मेहनत केल्यास काय काय गोष्टी साध्य होणार आहेत हें स्पष्ट दिसून येतें. पार्लमेंट सभेंत यानें एकंदर सरासरी चाळीस वर्षें घालविलीं आणि एवढ्या काळांत लोकहिताचीं त्यानें असंख्य कामें केलीं असतील. कोणतेंही काम एकवेळ हातीं घेतलें ह्मणजे मग त्यानें तें आपलें स्वतांचें असें समजून मनापासून झटून करावें. यामुळें कोणच्याही प्रकारें त्यांत कमताई न राहतां सर्व कांहीं यथास्थित होत असे. पार्लमेंट सभेंत अनेक प्रसंगीं निरनिराळ्या विषयांवर त्यानें भाषणें केलीं आहेत; परंतु त्याच्या लिहिण्यांत किंवा बोलण्यांत एक देखील अप्रयोजक शब्द मिळणार नाहीं. कसा जरी विषय असला तरी नीट मनन केल्याशिवाय त्यासंबंधाचे आपले विचार तो दुसऱ्यांस कळवीत नसे, आणि अशाविषयीं तो अतिशयच खबरदारी ठेवीत असे, असें ह्मटलें पाहिजे. आणखी असें कीं ऐकणारे लोक जसे असतील, त्यांची जशी कमी ज्यास्त विद्वत्ता असेल त्याप्रमाणें आपलें बोलणें सर्वांस समजेल अशा रीतीनें तो हातीं



घेतलेल्या विषयाची जुळणी करीत असे, आणि याजबद्दल त्याला कसे जरी श्रम पडले तरी तो मागें पुढें पाहत नसे. इतकेंही असून तो व्यवहारांत ह्मणजे कधीं फसणारा मनुष्य नव्हे. तसेंच त्याचा निश्चय अगदीं अढळ, ह्मणजे असें कीं अमकी एक गोष्ट चांगली अशी त्याची एकवेळ खात्री झाली कीं बस, मग ती तशी व्हावयाचीच. त्यांत कांहीं कसर होणें नाहीं. याशिवाय तो मोठा दूरदर्शी व पाहिजेल तें काम स्वतः करण्यास तयार असल्यामुळें अमक्या ठिकाणीं एक त्याला यश नाहीं आलें असें कधींही झालें नाहीं. ह्मातारा होऊन त्याचे केंस जरी पिकले तरी त्याची उमेद ह्मणून कमी झाली नाहीं. मरे तोंपर्यंत त्याचा सतत उद्योग चालला होता. त्यांत कांहीं कमताई झाली नाहीं. यामुळें दिवसेंदिवस त्याचे विचार अधिकाधिक प्रगल्भ होत गेले. नाहीं तर ह्मातारे लोक ह्मटले ह्मणजे बहुतकरून ते थोडेसे हेकट व दुराग्रही असतात आणि त्यांचा बहुतेक वेळ आळसांत व लोकनिंदेंतच जातो. परंतु याची गोष्ट तशी नव्हती. हा आपला एक क्षणभर देखील वेळ व्यर्थ दवडीत नसे आणि हा मनाचा मोठा दिलदार असल्यामुळें लोकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढणें ह्मणजे मोठें नीच काम आहे असें समजत असे. आत्मश्लाघेचाही तो फारसा भुकेलेला नव्हता. त्याच्या या अशा स्वभावामुळें कशी जरी व्यवहारबाह्य गोष्ट असली तरी सयुक्तिक जर आहे तर शेवटपर्यंत ती त्याला मान्य होत असे.

**लॉर्ड ब्रोह्याम** यानेंही बरेच दिवस प्रधानकीचें काम चालविलें. याच्या उद्योगाची तर शिकस्तच झाली असें ह्मटलें पाहिजे. किती जरी काम असलें तरी त्याचा त्याला

त्रास ह्मणून कधीं येत नसे. लोककल्याणाच्या कामांत त्यानें सरासरी साठ पांसष्ट वर्षें घालविलीं आणि एवढ्या काळांत एकच काम तो हातीं घेऊन बसला नाहीं. त्याचा मूळ धंदा ह्मटला ह्मणजे वकीलीचा. परंतु हा धंदा संभाळून त्यानें निरनिराळ्या प्रकारचे अनेक सर्वमान्य ग्रंथ लिहिले आहेत. राजदरबारांत तर त्याला पुष्कळच मान असे. पार्लमेंट सभेंत त्याचीं नेहमीं भाषणें होत असत आणि त्याच्या सल्ल्याशिवाय तिकडील बहुतेक कामाचा निकाल लागत नव्हता. याशिवाय रसायन, ज्योतिष वगैरे शास्त्रसंबंधी त्याचे शोध चाललेच होते आणि या विषयांच्या संबंधानें त्याचें ज्ञान केवळ वरवर होतें असें नाहीं, तर हे विषय त्याला पूर्णपणें अवगत असत. आतां या इतक्या कामांचा निभाव एका मनुष्याच्या हातून कसा लागत होता याचा मोठा चमत्कार आहे. एकवेळ असें झालें कीं सर **स्याम्युअल रॉमिली** या नांवाचा एक कोणी मानकरी होता, त्याला दरबारसंबंधी कांहीं काम पतकरण्याविषयीं अधिकारी लोकांचा फार आग्रह पडला. परंतु त्याच्या मागें दुसरीं आणखी पुष्कळ अवधानें असल्यामुळें सदरील कामाचा पतकरा त्याच्या हातून कांहीं घेववला नाहीं. तरी त्यानें असें सांगितलें कीं 'काम जर फार निकडीचेंच असलें तर **ब्रोह्याम** याची गांठ घेऊन त्यांजवर तें सोंपावें, ह्मणजे कोणतीही अडचण राहणार नाहीं. कारण **ब्रोह्याम** याला किती जरी काम असलें तरी अमकें एक काम करण्यास त्याला वेळ नाहीं असें कधींही होत नाहीं.' एवढी त्याच्या उद्योगाची प्रसिद्धि. तेव्हां असा हा उद्योग त्याला तोलत तरी कसा होता याचा थोडासा विचार केल्यास असें



...ातलें कारण ह्मणून एवढेंच कीं तो आपला एक क्षणभर देखील वेळ आळसांत घालवीत नसे. बरें इतकेंही असून त्याची प्रकृति जर पाहिली तर कशी दगडासारखी. दुखणें ह्मणून कसें तें त्याला आजन्मांत माहित नव्हतें. ह्मातारा झाला तेव्हां तरी त्यानें थोडीशी विश्रांति घ्यावी; कारण, ह्मटली ह्मणजे लोकांची चाल आहे कीं ह्मातारपण आलें, ह्मणजे स्वस्थ रामराम ह्मणावें आणि तरुणपणांत जे कांहीं दोन पैसे सांठवून ठेविले असतील त्यांजवर उपजीविका करावी. कोणी बिचारे तसेच पुण्यपराक्रमी प्राणी असतात त्यांची वेळ याची कुचेष्टा कर, त्याची कुचेष्टा कर अशामध्येंच जाते. परंतु एवढें खरें कीं ह्मातारपणीं शरीरास मेहेनत ह्मणून फारशी तोलत नाहीं. परंतु याची साठी गुजरली आणि नंतर यानें दर्शनानुशासनशास्त्र शिकण्यास आरंभ केला. आणि त्याचा त्यानें इतका कांहीं लक्ष लावून सपाट्यानें अभ्यास केला कीं लवकरच त्या विषयाच्या संबंधानें ज्या ज्या कांहीं नवीन गोष्टी त्याच्या पाहण्यांत आल्या, त्या त्यानें **पारिस** व **लंडन** शहरांतील मोठमोठ्या विद्वान पंडितांच्या सभा भरवून त्यांस सादर केल्या, आणि त्याजबद्दल तेथें त्याची मोठी वाहवा झाली. तसेंच तिसरा **जॉर्ज** याच्यावेळेस **इंग्लंडांत** जे कोणी शास्त्री व पंडित होऊन गेले त्यांच्या आयुष्याच्या वर्तनक्रमाचें त्यानें जें एक सर्वोत्कृष्ट पुस्तक लिहिलें आहे, तेंही पण त्यानें याच वेळेस तयार केलें. बरें, असें होतें ह्मणून त्याच्या वकीलीच्या धंद्यांत, किंवा पार्लमेंट सभेच्या कामांत कांहीं व्यत्यय यावा, तर तसेंही नाहीं. तीं सर्व कांहीं पूर्वीप्रमाणेंच सुरळीत चाललीं होतीं. **सिड्नी स्मिथ**चा आणि

त्याचा फार घरोबा, यामुळें तो त्याला नेहमीं अशी [illegible] मेहेनत न करण्याविषयीं सांगत असे. त्याचें ह्मणणें ह्मणज दुसरें कांहीं नव्हतें. एवढेंच कीं, निदान तीन चांगल्या धट्या कट्या मनुष्यांस झेपेल याच्यापेक्षां तरी त्यानें ज्यास्त मेहेनत करूं नये. परंतु **ब्रोल्याम** याला उद्योग ह्मणजे इतका कांहीं प्रिय झाला होता कीं व्यसनी मनुष्यास स्वतांचें व्यसन देखील इतकें प्रिय नसतें; आणि यामुळें त्याला कशी जरी मेहेनत करावी लागली तरी ती त्याच्या फारशी खिसगणतींत येऊं नये. याच्या संबंधानें दुसरी एक लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट आहे. ती अशी कीं, आपल्या कामांत नांव ठेवण्याजोगें ह्मणून कांहीं राहूं नये अशाबद्दल त्याचा मोठा कटाक्ष असे. यामुळें तें होईल तेवढें उत्तम रीतीनें करण्यासाठीं त्याचे प्रयत्न सतत चालू असत. यावरून त्याजबद्दल थट्टेनें कोणींसें एका ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं, **ब्रोल्याम** याला **ईश्वरानें** अशा मोठ्या कुळांत जन्मास घातलें हें ठीकच केलें, परंतु त्यानें त्याला चांभाराच्या कुळांत जरी जन्मास घातलें असतें आणि कदाचित् तोच धंदा त्यानें चालविला असता, तरी तिकडे देखील तो अशा या उद्योगी स्वभावामुळें आपलें नांव काढल्यावांचून राहता ना. त्याच्या हातचे जोडे व बूट इंग्लंडांत सर्वांस पसंत पडते आणि **ब्रोल्याम** ह्मणजे अगदीं 'नंबर वन' ह्मणजे पहिल्या प्रतीचा चांभार अशी त्याची सर्वत्र प्रसिद्धि झाली असती.

हिंदुस्थानचे माजी व्हाइसरॉय आणि गवर्नर जनरल **लॉर्ड लिटन** यांचे वडील सर **ई बुलवर लिटन** यांचीही अशाच प्रकारच्या उद्योगी व पराक्रमी पुरुषांत गणना होत असते. इंग्लंडांत आज पर्यंत दुसरे अनेक ग्रंथकार होऊन गेले, परंतु



त्यासारखा उद्योग फारच थोड्यांचा असेल. याच्याप्रमाणें निरनिराळ्या प्रकारचे ग्रंथ थोड्याच असामींनीं लिहिले असतील आणि फारच थोड्यांचा असा लौकिक झाला असेल. **बुलवरचीं** नाटकें व कादंबऱ्या पुष्कळांच्या पाहण्यांत आहेत, परंतु या शिवाय त्याचे कविता व इतिहास ग्रंथही अनेक आहेत. त्याच्या हातचे कांहीं निबंध पण आहेत आणि तेही मोठे वाचण्यालायख आहेत. तसेंच तो पहिल्या प्रतीचा वक्ता असून मोठा राजकारस्थानी पुरुष असे. बरें इतकेंही असून त्याची बुद्धि ह्मणजे फार तीव्र होती अशांतला प्रकार मुळीच नव्हता. इतर लोकांच्या बुद्धीप्रमाणें त्याची बुद्धि. त्याच्याचमध्यें ह्मणजे कांहीं विशेष होतें असें नाहीं. परंतु त्याचा उद्योग मोठा आणि त्याची मेहेनत जबर यामुळें त्याला आस्ते आस्ते या सर्व कांहीं गोष्टी साध्य झाल्या. हातीं घेतलेल्या कामांत यश मिळावें आणि तें चांगल्या रीतीनें तडीस जावें एवढीच त्याची मुख्य इच्छा असल्यामुळें स्वतांच्या सुखदुःखाचीही त्यानें फारशी परवा केली नाहीं. याजबद्दल त्याची तारीफ करावी तेवढी थोडकीच होणार आहे. कारण, पुस्तकें वगैरे छापून त्यांपासून पैसा मिळवावा अशी त्याची मुळींच इच्छा नव्हती आणि तसें करण्याची त्याला जरूरीही नव्हती. परंतु तो आपला त्याला एक शौक असे. नाहींतर पाहिलें असतां घरचा तो लाखोपती, त्याला हे असले धंदे कोणी सांगितलें होते? त्यानें ह्मटलें ह्मणजे कोठें घोड्यावर बसावें, फेरफटका करावा, गोळी मारावी, शिकारीस जावें, निरनिराळ्या क्लबमध्यें फिरावें, नाटकें पहावीं, नाच तमाशे करवावे, मजा मारावी, आणि अशा रीतीनें आपला वेळ घालवावा; आणि याकरतां त्याला

ह्मणजे कोणीं नांव ठेवलें असतें असेंही नाहीं. कदाचित् शहरांत राहून कंटाळा आला, तर कोठें हिराबाग, मोतीबाग अशा सारख्या ठिकाणीं जावें, उत्तम उत्तम प्रकारचें मिष्टान्न सेवन करावें, आणि लागेल तशी मजा मारावी. बरें, कांहीं दिवसांनीं यांतही कांहीं चव नाहींशी झाली ह्मणजे मग **पारीस, व्हाएना, रोम** वगैरे मोठमोठ्या शहरांत जाऊन तेथें जी कांहीं मजा मारण्याजोगी असेल ती मारावी. सारांश काय तर खावें, प्यावें, आणि चैन करावी अशा रीतीनें त्यानें आपले आयुष्याचे दिवस घालवावे. असा आज पुष्कळांचा क्रम चालला आहे, आणि **बुलवर**ला ह्मणजे कांहीं कमी होतें असेंही नाहीं. त्याला हें सर्व कांहीं अनुकूळ होतें. परंतु त्याला हे अशा प्रकारचे नाद मात्र नव्हते. त्याला नाद ह्मटला ह्मणजे एक पुस्तकांचा, आणि या नादापुढें बाकीचे सर्व नाद त्याला केवळ क्षुद्र वाटत आणि त्यांचा तो धिक्कार करी. त्याचा बहुतेक वेळ लिहिण्यावाचण्यांतच जात असे. पहिल्याच खेपेस त्यानें जें पुस्तक लिहिलें तें कांहींसें कवितेचें होतें. परंतु तें कांहीं बरोबर उतरावें तसें उतरलें नाहीं. यामुळें वर्तमानपत्रांतून त्याची पुष्कळ बचेरी झाली. दुसऱ्या खेपेस **फॉकलंड** या नांवाची त्यानें एक कादंबरी लिहिली. तिच्यामध्येंही कांहीं फारसा दम नव्हता यामुळें तिचीही सदरहूप्रमाणेंच व्यवस्था झाली. याप्रमाणें त्याचे दोन्हीही पहिलेच प्रयत्न निष्फळ झाले. तरी त्यानें आपला उद्योग सोडला नाहीं. नाहीं तर दुसरा असाच कोणी एखादा आरंभशूर असता ह्मणजे पुनः त्यानें लेखणी देखील हातांत धरली नसती. परंतु **बुलवर**ची छाती मोठी आणि त्याचें धोरणही जबर यामुळें त्याचा पुरा



निश्चय कीं हातीं घेतलेलें काम अर्धकच्चें ह्मणून कधीं टाकणें नाहीं. याकरतां त्यानें नानातऱ्हेचीं पुस्तकें वाचलीं, रात्रंदिवस मेहेनत केली आणि एक वर्षाच्या आंत '**पेल्ह्याम**' नांवाची कादंबरी लिहिण्यास त्यानें सुरवात केली, आणि लौकरच ती छापून प्रसिद्ध केली. ही कादंबरी फारच उत्कृष्ट उतरली आहे. ईत नांव ठेवण्याजोगें ह्मणून कांहींच राहिलें नाहीं. यामुळें वर्तमानपत्रांतून यावेळेस त्याची फारच तारीफ झाली. पुढें त्यानें सरासरी तीस वर्षेपर्यंत असाच क्रम चालू ठेवला; आणि एवढ्या काळांत त्यानें जीं कांहीं पुस्तकें लिहिलीं तीं एकापेक्षां एक सरस आहेत. त्यांची योग्यता विशेष असल्यामुळें आज काल तीं सर्वमान्य झालीं आहेत. त्याच्या संगतीनें त्याची बायको **रोझीना** इची योग्यताही बरीच वाढली. इच्या हातच्याही कांहीं रसभरीत कादंबऱ्या आहेत.

**बेंजामिन डिस्राएली** ह्मणजे ज्याला **लॉर्ड बीकन्सफील्ड** असें ह्मणत असत आणि जो महाराणीचा कांहीं वर्षे मुख्य प्रधान असे, याचेंही असेंच एक मोठें चमत्कारिक उदाहरण घेण्याजोगें आहे. हा जो आज एवढ्या मोठ्या योग्यतेस चढला होता तो केवळ स्वतांच्या उद्योगानें आणि मेहनतीनें. **बुलवर**प्रमाणें यानेंही बरींच पुस्तकें लिहिलीं आहेत आणि पहिल्यानें जी याची प्रसिद्धि झाली ती या पुस्तकांवरूनच. तरी या कामांत ह्मणजे पहिल्याच खेपेस याला यश आलें असें नाहीं. पुष्कळ वेळां जेव्हां त्यानें ठोकर खाल्ली तेव्हां नंतर मग कोठें त्याचें लिहिणें लोकांस पसंत पडूं लागलें. '**वंड्रस टेल ऑफ् अल्राय**' आणि '**रेवोल्युशनरी एपिक**'

अशीं त्यानें सकृद्दर्शनीं कवितांचीं दोन पुस्तकें लिहिलीं आणि तीं कांहीं लोकांनां आवडलीं नाहींत. यामुळें त्याची सर्वत्र थट्टाच उडाली. उगीच आपली कांहीं तरी बडबड केली आहे असें सुद्धां कित्येक बोलून चुकले. परंतु **बेंजामिन**नें अशा या बोलण्याची फारशी परवा केली नाहीं आणि आपला उद्योग मात्र पूर्वींप्रमाणेंच चालू ठेवला. यामुळें पुढें लौकरच जेव्हां त्यानें '**कॉनिग्सबी**' '**सिबिल**' आणि '**टॉक्रेड**' अशा सारखीं सर्वमान्य पुस्तकें छापवून प्रसिद्ध केली, तेव्हां त्याच्यामध्यें खरोखर काय पाणी आहे हें लोकांच्या नजरेस येऊन त्याजबद्दल त्याची सर्वत्र वाहवाच झाली. पार्लमेंट सभेंत त्याची नेमणूक झाली तेव्हां ही असेंच. पहिल्या दिवशीं त्याला तिकडे जें कांहीं बोलायाचें होतें तें तो एका कागदावर लिहून तोंडपाठ करून घेऊन गेला होता. त्यांत मोठमोठे शब्द घालून आपल्या मतें त्यानें त्याची रचना उत्तम केली होती. परंतु त्यानें बोलण्याला मात्र सुरवात केली तों इकडे लोकांनीं हंसण्यास व टाळ्या पिटण्यास आरंभ केला, आणि पुनः आपल्या जागेवर तो बसेतोंपर्यंत त्यांनीं त्याची एकसारखी हुर्यो करून सोडली. आपण ही इतकी केलेली मेहेनत व्यर्थ गेली असें पाहून **बेंजामिन**ला फार वाईट वाटलें, परंतु करतो काय, नाइलाजाची गोष्ट. तरी बसतां बसतां तो मोठ्यानें असें बोलला कीं 'आज तुह्मीं मला हंसलांत हें ठीकच आहे; त्यांत कांहीं वावगें झालें असें नाहीं. तरी कोणतीही गोष्ट ह्मटली ह्मणजे मनुष्याला पहिल्याच खेपेस साधते असें नाहीं. आजपर्यंत मीं पुष्कळ कामें हातीं घेतलीं आणि तीं सर्व कांहीं माझ्या स्वतांच्या मेहनतीनें मीं आस्तेआस्ते शेवटास नेलीं आहेत, आणि



यांतच ह्मणजे कांहीं विशेष आहे असें नाहीं. ह्मणून आज जरी मला बरोबर बोलतां नाहीं आलें, तरी माझी अशी पक्की खात्री आहे कीं आज नाहीं उद्या, उद्या नाहीं परवां, कधीं नाहीं कधीं तरी लौकरच या ठिकाणीं आपणा सर्वांसमक्ष मी अशा रीतीनें भाषण करीन कीं त्यामध्यें हंसण्यास किंवा नांव ठेवण्यास कोणच्याही प्रकारें जागा मिळणार नाहीं.' ही आपली प्रतिज्ञा त्यानें कोणच्या रीतीनें खरी केली हें पुष्कळांस माहित आहे. तो पार्लमेंट सभेंत बोलूं लागला ह्मणजे लोक ऐकण्यास फारच उत्सुक असत, आणि त्याची तिकडे थट्टा वगैरे उडत नसे एवढेंच नव्हे तर त्याचें बोलणें लोकांस इतकें कांहीं पसंत पडे कीं तो बोलूं लागला ह्मणजे त्याजबद्दल ते मानाच तुकावीत असत. यावरून त्याच्या उद्योगाची व मेहेनतीची वाचकांस सहज अटकळ होणार आहे. उद्योगापासून मनुष्याची उन्नति कशी होते हें दाखविण्यास हें एक मोठें मासलेवाइक उदाहरण आहे. पुष्कळ लोकांची अशी कांहीं चाल आहे कीं कोणतेंही हातीं घेतलेलें काम पहिल्याच खेपेस साधलें तर ठीक, नाहीं तर त्याचें ते पुनः नांव देखील घेणार नाहींत आणि व्यर्थ आपल्या नशीबास शिव्या देत बसतील. परंतु **बेंजामिन**नें आपलें नशीब खोटें किंवा आपली वेळच वाईट असें न ह्मणतां आपली मेहेनत मात्र खरी केली. आपल्यामध्यें कोणत्या गोष्टींची कमताई आहे व आपलें बोलणें लोकांस कसें पसंत पडेल हें जाणण्यावि-विषयीं तो फार उत्सुक असे. आणि अशा प्रकारचें हें धोरण लक्षांत ठेवून त्यानें आपला अभ्यास सतत चालू ठेवला; **पार्लमेंट** सभेंत जुने जे कांहीं लेख होते ते

सर्व त्यानें चाळून पाहिलें. यामुळें असें झालें कीं अवकाशाअंतीं त्याचे सर्व कांहीं बेत तडीस गेले आणि एकंदरींत त्याच्यासारखे बोलणारे चतुर व धोरणी पुरुष पार्लमेंट सभेंत फारच थोडे सांपडतील. **विक्टोरिआ महाराणी**ची त्याजवर पूर्ण कृपा असे. त्यांजकडूनच त्यास **अर्ल**ची पदवी देण्यांत आली.

असो याप्रमाणें स्वतांच्या उद्योगानें आणि मेहनतीनेंच आपल्यास पाहिजेल त्या गोष्टी जरी साध्य करून घेतां येतात तरी एकंदरींत कोणच्याही प्रकारें दुसऱ्यांशीं बेपर्वाईचें किंवा उद्दामपणाचें वर्तन ठेवणें हें देखील आपल्या मनुष्यपणास शोभत नाहीं. कारण दुसऱ्याच्या मदतीचीही अनेक प्रसंगीं या जगांत आपल्यास गरज बाळगावी लागते. **वर्डस्वर्थ** कवीनें यासंबंधानें एका ठिकाणीं ह्मटलें आहे तें खोटें नव्हे. तो ह्मणतो कीं, मनुष्यामध्यें स्वतंत्रता आणि लीनता या दोन्ही गोष्टींची अवश्यकता आहे. ज्या कामाचा स्वतांच्या मेहनतीनेंच आपल्यास निभाव लागणार आहे त्याजबद्दल व्यर्थ दुसऱ्यास तसदी न देणें याला ह्मणतात स्वतंत्रता. परंतु कांहीं कारणामुळें जर आपल्यावर दुसऱ्याचे उपकार झाले तर ते खरोखर स्मरणें आणि कारणाशिवाय उगीच एखाद्याचें मन न दुखविणें याला ह्मणतात लीनता. स्वतंत्रता आणि लीनता या दोहोंमध्यें कित्येकांच्या मतें जरी कांहीं विरोध दिसून येतो तरी एकंदरींत या दोहोंचें ऐक्य असणें हेंच रास्त आहे. जन्मास आल्यापासून तों मरेपर्यंत कांहीं गोष्टींमध्यें ईश्वरानें मनुष्यास अगदीं पराधीन करून ठेवलें आहे. लहानपणीं आईबाप आपला हरएक प्रकारें सांभाळ



विद्यामृत पाजतात हे त्यांचे आपल्यावर केवढे थोर उपकार? स्नेहसंबंधी, इष्टमित्र, आप्तसोयरे वगैरे नेहमीं आपल्या भेटीस येतात, आपल्याशीं गोड गोड भाषण करतात आणि आपलें सर्वप्रकारें हितचिंतन करतात हे देखील त्यांचे आपल्यावर लहानसान उपकार नव्हेत. याशिवाय कित्येक असे कांहीं सत्पुरुष असतात कीं वास्तविक त्यांचा आपला संबंध जर पाहिला तर कांहींएक नसतो, परंतु केवळ स्वतांच्या सद्वर्तनानेंच ते आपल्यास सन्मार्गीं जाण्यास प्रवृत्त करतात. हे झाले तरी त्यांचे आपल्यावर एका प्रकारचे उपकारच समजले पाहिजेत; आणि खरोखर जे सुज्ञ व विचारी असतात ते अशा प्रकारचे देखील उपकार स्मरण्यास बिलकुल आळस करीत नाहींत. अशा रीतीनें त्यांच्या स्वतंत्रतेंत कोणच्याही प्रकारें बाध येतो असें तर मुळींच नाहीं, परंतु अंगीं लीनता असल्यामुळें तिची शोभा कांहीं विशेष दिसून येते.

**अलेक्सिस डी टोकेविल** ह्मणून फ्रान्स देशांत एक मोठा विद्वान् पंडित होऊन गेला. त्याचे इतिहास व राज्यव्यवस्थे संबंधीं पुष्कळ ग्रंथ प्रसिद्ध आहेत. याचें घराणें जर पाहिलें तर लहानसान नव्हे; ह्मणजे असें कीं याचा बाप जो होता त्याची फ्रान्स देशांतील बड्या बड्या मानकऱ्यांत गणना होत असून त्याची जी आई ती **मालशर्बीस** याची नात. तेव्हां दोहोंकडून जरी पाहिलें तरी सरकार दरबारांत त्याचा वशीला मोठा. त्याला कोणताही अधिकार अथवा हुद्दा मिळविणें ह्मणजे फारशी खटपट करण्याची जरूर नव्हती. बोलायाची खोटी. कामाची गैरमाहिती किंवा वय लहान अशा प्रकारची सबब तिकडे

मुळींच चालणें नाहीं. यामुळें तो एकवीस वर्षांचा झाला नाहीं तोंच वडिलांच्या खटपटीनें **वर्सेल्स** एथें जज्ज आडिटरच्या जागेवर याची नेमणूक झाली. अशा जागा ह्मणजे नेहमीं मिळतात असें नाहीं. परंतु **अलेक्सस** याला तो एकंदर झालेला प्रकार आणि ती खटपट हीं मुळींच आवडलीं नाहींत. त्याचें ह्मणणें असें कीं जें कांहीं करणें त्यांत स्वतांचा ह्मणून कांहीं तरी पराक्रम असावा. दुसऱ्याच्या जीवावर फुषारकी मिरविणें हें त्याला अगदीं आवडत नसे. यामुळें कांहीं महिने गेले नाहींत तोंच त्यानें ती चाकरी सोडली आणि बेत केला कीं जे कांहीं पुढें दोन पैसे मिळविणें ते स्वतांच्या मेहनतीनेंच मिळवावें. त्यांत दुसऱ्या कोणाची कांहीं खटपट असूं नये. हा त्याचा बेत पुष्कळांस आवडणार नाहीं आणि कदाचित् त्याला ते वेड्यांमध्येंही काढतील. परंतु **अलेक्सिस** यानें आपला बेत तडीस नेला. त्या जागेचा त्यानें राजीनामा दिला आणि नंतर तो अमेरिकेंत गेला. तिकडे **युनायटेड स्टेट्स** एथें राज्यकारभार कसा काय चालवितात हें पाहून त्याजवर त्यानें '**डिमॉक्रसी इन अमेरिका**' या नांवाचें एक उत्कृष्ट पुस्तक लिहिलें. त्यांत त्यानें आपल्या प्रवासाचीही एकंदर हकीगत दिली आहे. या पुस्तकावरून त्याची पुष्कळ प्रसिद्धी झाली आणि यामुळें तिकडे त्याला मोठमोठे अधिकार मिळत गेले. **गुस्ताव डी बोमंट** या नांवाचा त्याचा एक स्नेही अमेरिका पाहण्याकरतां ह्मणून त्याच्या बरोबर गेला होता. तो त्याच्या उद्योगाची तर फारच तारीफ करतो. तो ह्मणतो कीं असा उद्योगी स्वभाव आपण कोणाचाच पाहिला नाहीं. आळस ह्मणजे कसा काय तो याला



अगदीं माहित नव्हता. यामुळें हा प्रवासांत फिरणीवर असो किंवा एका ठिकाणीं बसलेला असो याच्या मनाला ह्मणून कधींही विसावा नसे. त्याचे विचारतरंग नेहमीं चाललेलेच असत. **अलेक्सिस** बरोबर कांहीं भाषण करणें ह्मणजे त्यांत जर कांहीं उपयुक्त विषय असेल तरच तो तें ऐकण्यास खुषी असे. उगीच आपल्या इकडच्या तिकडच्या भाकडकथा किंवा एखाद्याची निंदा ऐकण्यास त्याचें मन मुळींच घेत नसे. ज्या दिवशीं त्याच्या हातून कांहीं योग्य उद्योग झाला नाहीं, असा दिवस त्याच्यामतें फारच वाईट रीतीनें गेला. कारण, एकक्षणभर जरी त्याचा वेळ फुकट गेला तरी त्याची त्याला फार हळहळ वाटे. त्यानें स्वतां आपल्या एका मित्रास पत्र लिहिलें आहे त्यांत तो असें ह्मणतो कीं, 'या जगांत आपण आहों तोंपर्यंत वेळ घालविण्यास आपल्यास कांहीं ना कांहीं अवधान ह्मणून असलें पाहिजे. त्याशिवाय मनुष्याचें जिणें व्यर्थ. शरीराला जर कांहीं व्यवसाय आहे तरच तें चांगल्या रीतीनें राहणार आहे आणि मनाची गोष्ट झाली तरी तशीच. त्याला जर बरोबर अटकेंत नाहीं ठेवलें, तर तेंही पण अगदीं निरुपयोगी होणार आहे. आणि हा नियम लहान थोर सर्वांस एकसारखा लागू आहे. तरुणपणींच मनुष्यानें उद्योग करावा आणि ह्मातारपणीं करूं नये असें नाहीं. ह्मातारपणीं तर उद्योगाची विशेष अवश्यकता दिसून येते. कारण जसजसे आपण ह्मतारे होत जातो, त्या त्या मानानें आपल्या शरीरावरच नव्हे तर मनावरही एका प्रकारचें शैथिल्य उत्पन्न होतें, आणि तें घालविण्याचा जर योग्य प्रयत्न केला नाहीं तर त्याचा जोर विशेष होत जातो. उत्तरेकडील

थंड प्रदेशांत जात असतां अंगीं उष्णता येण्याकरतां आपल्यास जसें मोठ्या सपाट्यानें चालावें लागतें, त्याचप्रमाणें वृद्धापकाळाचें शैथिल्य अंशतः तरी नष्ट होऊन अंगीं हुशारी राहावी याकरतां मनुष्यास कांहीं ना कांहीं उद्योग असणें हें अवश्य आहे. उद्योग नसला ह्मणजे मनाला एका प्रकारची उद्विग्नता उत्पन्न होते, आणि इच्यासारखा मनाला दुसरा मोठा रोग नाहीं. हा रोग दूर करण्याकरतां मनालाच नव्हे तर शरीरालाही पण कांहीं व्यवसाय पाहिजे.'

याप्रमाणें त्याचे स्वतंत्र विचार. दुसऱ्याच्या ओंजळींतून पाणी पिणें हें त्याला अगदीं आवडत नसे आणि जें कांहीं करणें तें स्वतांच्या मणगटाच्या जोरानें करावें अशाबद्दल त्याचा फार आग्रह. तरी त्याचा स्वभाव जर पाहिला तर फारच सरळ व साधा. अंगीं लीनता ह्मणजे इतकी कीं तोंडून अपशब्द ह्मणून त्याच्या कधीं निघत नसे. तसेंच दुसऱ्याचे उपकार ह्मटले ह्मणजे या जगांत आपल्यावर कांहींना कांहीं होतच असतात, परंतु ते स्मरणारे याच्यासारखे फारच थोडे. फार तर काय, परंतु याचे दोन स्नेही होते आणि त्यांचा व याचा अभ्यास एका ठिकाणीं होत असे. तेव्हां त्यांच्या सहवासानें स्वतांच्या अभ्यासांत त्याला जी कांहीं थोडीबहुत मदत झाली तीजबद्दल त्यांचा तो फारच आभारी असे, एवढेंच नव्हे तर त्यांची संगत असल्यामुळें कोणत्याही प्रकारें आडमार्गानें जाण्यास आपण प्रवृत्त झालों नाहीं, असेंही तो वेळोवेळीं मोठ्या उदार बुद्धीनें कबूल करीत असे. दुसरें आणखी असें कीं त्याची लग्नाची बायको **मेरी**, जी सर्व प्रकारें त्याजवर अवलंबून राहणारी, तिच्या विचारी व शांत स्वभावामुळेंच स्वतांच्या अभ्यासांत व सर्व

…ाभारप्रदर्शक त्यानें कांहीं लेख लिहून ठेव… आ…
…न ह्मणणें असें कीं मनुष्याला जशी सुशील किंवा कलागत बायको भेटेल त्याप्रमाणें त्याचा स्वभाव चांगला किंवा वाईट होतो आणि तदनुरोधानें त्याच्या उद्योगांत त्याला यश अपेक्ष…

असो, एकंदरीं… …ा होण्यास या जगांत
हजारों कारणें … …पणापासून शिक्षण
ह्मणून कांहीं … …ुस्तकें चांगलीं चांगलीं
वाचलीं पा… …ाजारी चांगले असले
पाहिजेत; … …ते ज्यांच्यांशीं आपलें दळणवळण … चांगलें असलें पाहिजे.
वाडवडि… …, त्यांचा जसा बरावाईट
लौकि… … देखील आपली चालचलणूक… …री मोठीं अगत्याचीं कारणें
आ… …ीस मुख्य कारण ह्मटलें ह्मणजे
… …तांचें हित अहित हें ज्याचें
… …ा त्याजबद्दल त्यानें स्वतां उद्योग
… …ाशिवाय या जगांत सर्व कांहीं
… …गी सुज्ञ व विचारी आहेत ते जरी
… …न दुसऱ्यांची मदत कबूल करतात तरी
त्या… …स्वतांचाच उद्योग त्यांच्या उन्नतीस कारण झाला व होतो ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे.

थंड प्रदेशांत जात असतां अंगीं उष्णता येण्याकरतां आपल्यास जसें मोठ्या सपाट्यानें चालावें लागतें, त्याचप्रमाणें वृद्धापकाळाचें शैथिल्य अंशतः तरी नष्ट होऊन अंगीं हुशारी राहावी याकरतां मनुष्यास कांहीं ना कांहीं उद्योग असणें हें अवश्य आहे. उद्योग नसला ह्मणजे मनाला एका प्रकारची उद्विग्नता उत्पन्न होते, आणि इच्यासारखा मनाला दुसरा मोठा रोग नाहीं. हा रोग दूर करण्याकरतां मनालाच नव्हे तर शरीरालाही पण कांहीं व्यवसाय पाहिजे.'

याप्रमाणें त्याचे स्वतंत्र विचार. दुसऱ्याच्या ओंजळींतून पाणी पिणें हें त्याला अगदीं आवडत नसे आणि जें कांहीं करणें तें स्वतांच्या मणगटाच्या जोरानें करावें अशाबद्दल त्याचा फार आग्रह. तरी त्याचा स्वभाव जर पाहिला तर फारच सरळ व साधा. अंगीं लीनता ह्मणजे इतकी कीं तोंडून अपशब्द ह्मणून त्याच्या कधीं निघत नसे. तसेंच दुसऱ्याचे उपकार ह्मटले ह्मणजे या जगांत आपल्यावर कांहींना कांहीं होतच असतात, परंतु ते स्मरणारे याच्यासारखे फारच थोडे. फार तर काय, परंतु याचे दोन स्नेही होते आणि त्यांचा व याचा अभ्यास एका ठिकाणीं होत असे. तेव्हां त्यांच्या सहवासानें स्वतांच्या अभ्यासांत त्याला जी कांहीं थोडीबहुत मदत झाली तीजबद्दल त्यांचा तो फारच आभारी असे, एवढेंच नव्हे तर त्यांची संगत असल्यामुळें कोणच्याही प्रकारें आडमार्गानें जाण्यास आपण प्रवृत्त झालों नाहीं, असेंही तो वेळोवेळीं मोठ्या उदार बुद्धीनें कबूल करीत असे. दुसरें आणखी असें कीं त्याची लग्नाची बायको **मेरी**, जी सर्व प्रकारें त्याजवर अवलंबून राहणारी, तिच्या विचारी व शांत स्वभावामुळेंच स्वतांच्या अभ्यासांत व सर्व



कांहीं उद्योगांत आपल्यास यश मिळालें अशा अर्थाचे [illegible] आहेत [illegible]आभारप्रदर्शक त्यानें कांहीं लेख लिहून ठेवले आहे[illegible] [illegible] ह्मणणें असें कीं मनुष्याला जशी सुशील किंवा कलागत बायको भेटेल त्याप्रमाणें त्याचा स्वभाव चांगला किंवा वाईट होतो आणि तदनुरोधानें त्याच्या उद्योगांत त्याला यश अपेश येतें.

असो, एकंदरींत मनुष्याची सुधारणा होण्यास या जगांत हजारों कारणें लागत असतात. लहानपणापासून शिक्षण ह्मणून कांहीं तरी असलें पाहिजे; पुस्तकें चांगलीं चांगलीं वाचलीं पाहिजेत; संगत व शेजारीपाजारी चांगले असले पाहिजेत; आणि घरचे लोक, ह्मणजे ज्यांच्यांशीं आपलें दळणवळण फार अशांचें वर्तनही चांगलें असलें पाहिजे. वाडवडिलांची जशी कीर्ति असेल, त्यांचा जसा बरावाईट लौकिक असेल, त्या त्याप्रमाणें देखील आपली चालचलणूक फिरणार आहे. हीं सर्व जरी मोठीं अगत्याचीं कारणें आहेत तरी मनुष्याच्या उन्नतीस मुख्य कारण ह्मटलें ह्मणजे एकच आणि तें हें कीं स्वतांचें हित अहित हें ज्याचें त्याला समजलें पाहिजे आणि त्याजबद्दल त्यानें स्वतां उद्योग केला पाहिजे. स्वतां खपल्याशिवाय या जगांत सर्व कांहीं व्यर्थ आहे. आतां जे कोणी सुज्ञ व विचारी आहेत ते जरी मोठ्या उदार बुद्धीनें दुसऱ्यांची मदत कबूल करतात तरी त्यांचा स्वतांचाच उद्योग त्यांच्या उन्नतीस कारण झाला व होतो ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे.